मंगळवार, २९ ऑगस्ट २०२३
किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
मराठी • दैनिक
वर्ष - ०३ • अंक - ३१
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

• MARATHI • DAINIK • CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) • TUESDAY 29 AUGUST 2023 | adhunikkesari.com Adhunik Kesari | • YEAR-03 • ISSUE-31 • RNI : MAHMAR/2021/82566 • PAGE-12 • PRICE-5

# सरकारविरोधात 'पंगा' घेऊ नका

## ममता बॅनर्जींचा राज्यपाल सी.व्ही. आनंदा बोस यांना इशारा



आधुनिक केसरी न्यूज

**कोलकत्ता : राज्यपाल सी.व्ही. आनंदा बोस यांच्यावर मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी सोमवारी जोरदार टीका केली. राज्यपाल संवैधानिक नियमांचा भंग करत असून त्यांच्या घटनेच्या विरोधातील कृत्यांना मी पाठिंबा देणार नाही, असे त्यांनी स्पष्ट केले. लोकांनी निवडून दिलेल्या सरकारविरोधात 'पंगा' घेऊ नका, असा इशाराच त्यांनी यावेळी दिला. ममता बॅनर्जी यांनी सोमवारी पक्षाच्या युवक मेळाव्याला संबोधित करत असताना भाजपावर जोरदार टीका केली. भाजपा कदाचित डिसेंबर महिन्यात लोकसभा निवडणुका घेऊ शकतो, अशी शक्यता त्यांनी वर्तविली. निवडणुकीचा प्रचार करण्यासाठी भाजपाकडून देशभरात हेलिकॉप्टर्स बुक करण्यात आले असल्याचा दावाही त्यांनी केला. तसेच भाजपा जर तिसऱ्यांदा सत्तेत आल्यास देशात हुकूमशाही लागू करेल, असाही इशारा युवक मेळाव्यात बोलत असताना त्यांनी दिला.**

भाजपाने आताच देशातील समाजासमाजामध्ये वैमनस्य निर्माण केले आहे, जर ते पुन्हा सत्तेवर आले तर आपला देश द्वेषावर आधारित राष्ट्र बनेल. भारतातील विद्यमान लोकसभेची मुदत २०२४ मध्ये संपत आहे. भाजपाने आतापासून देशभरातील हेलिकॉप्टर्स बुक करून ठेवले आहेत. जेणेकरून निवडणुकीची घोषणा झाली तर इतर राजकीय पक्षांना त्यांच्या प्रचारासाठी हेलिकॉप्टर उपलब्ध होऊ शकणार नाहीत, असा दावा बॅनर्जी यांनी केला. पश्चिम बंगालच्या उत्तर २४ परगाणा जिल्ह्यात रविवारी सकाळी अवैध फटाक्याच्या कारखान्यात स्फोट झाल्यामुळे नऊ लोकांचा मृत्यू झाला होता. या दुर्घटनेबद्दल बोलताना मुख्यमंत्री म्हणाल्या, काही लोक अवैध धंद्यात गुंतलेले असून त्यांना काही भ्रष्ट पोलिस अधिकाऱ्यांचा पाठिंबा मिळत आहे. पोलिस प्रशासनातील बहुतेक अधिकारी प्रामाणिकपणे आपले कर्तव्य बजावत असतात. पण काही भ्रष्ट पोलिस अधिकारीच अवैध धंद्यांना बळ देतात. या लोकांना मी इशारा देते की, ज्याप्रमाणे रँगिंग विरोधी विभागाची स्थापना करण्यात आली आहे. त्याप्रमाणे भ्रष्टाचार विरोधी विभागाचीही स्थापना करून अशा लोकांना धडा शिकवू. जे लोक फटाके निर्माण करण्याच्या व्यवसायात आहेत, त्यांनी आता हरित फटाके निर्माण करण्याच्या दिशेने प्रयत्न करावेत, असे आवाहनही त्यांनी केले. हरित फाटके उत्पादित करण्यात अडचण काय आहे? कदाचित तुमचा नफा थोडासा कमी होईल. पण हा अतिशय सुरक्षित आणि पर्यावरणपूरक असा पर्याय असेल, असेही त्या म्हणाल्या. जादवपूर विद्यापीठातील विद्यार्थी मृत्यूच्या प्रकरणानंतर अखिल भारतीय विद्यार्थी परिषद आणि भाजपाच्यावतीने 'गोली मारो' घोषणा देण्यात आल्या, यावरही बॅनर्जी यांनी आक्षेप व्यक्त केला. अशाप्रकारच्या द्वेषपूर्ण घोषणा देणाऱ्यांना अटक करण्यात येईल, असेही त्या म्हणाल्या. ज्यांनी अशाप्रकारच्या घोषणा दिल्या, त्यांनी हे विसरू नये की, हा उत्तर प्रदेश नसून बंगाल आहे, असा सज्जड इशाराही त्यांनी दिला. ममता बॅनर्जी यांनी लोकसभा निवडणुकीबाबत जे भाकीत वर्तविले त्यावर कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया (मार्क्सवादी)चे नेते सुजन चक्रवर्ती म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची माहिती ठेवण्यात मुख्यमंत्री पटाईत आहेत.




# नीरज चोप्राची गोल्डन कामगिरी

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** जागतिक ॲथलेटिक्स चॅम्पियनशीपमध्ये सुवर्णपदकावर नाव कोरल्यानंतर नीरज चोप्रा याची सध्या जगभरात चर्चा सुरु आहे. मागील सात वर्षांमध्ये नीरज चोप्रा याने सात सुवर्णपदकावर नाव कोरले.
नीरज चोप्रा सध्या भारतातील सर्वात प्रसिद्ध खेळाडूमध्ये गणला जातो. नीरज चोप्रा याने अशक्य गोष्ट शक्य करुन दाखवली. सात वर्षांपासून नीरज चोप्रा याने भारतीयांची मान अभिमानाने उंचावली आहे. नीरज चोप्रा याच्यावर देशभरातून कौतुकाचा वर्षाव होत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यापासून ते देशभरातील प्रत्येक नागरिक नीरज चोप्रा याच्या कामगिरीचे कौतुक करत आहे. 2016 मध्ये ज्युनिअर विश्व चॅम्पियनशीपमध्ये सुवर्णपदक जिंकल्यानंतर नीरज चोप्रा सर्वात आधी चर्चेत आला होता. त्यानंतर नीरज चोप्रा याच्या नावाची चर्चा सुरुच आहे. त्याने लोकांचा हिरमोडही केला नाही.
जागतिक ॲथलेटिक्स चॅम्पियनशीपमध्ये भारताच्या इतर खेळाडूंनी निराशाजनक कामगिरी केली. पण नीरज चोप्रा याने आपेक्षेप्रमाणे भारताला सुवर्णपदक जिंकून दिले. स्पर्धेच्या सुरुवात झाल्यापासूनच नीरज चोप्राकडून सर्वांनाच पदकाची आपेक्षा होती, त्याने ती पूर्ण केली.
नीरज चोप्राचा जन्म सर्व सामान्य कुटुंबात झाला होता. फिटनेससाठी नीरज चोप्रा याने भालाफेक करण्यास सुरुवात केली होती. भालाफेकमध्ये त्याचे सातत्य पाहून त्याला यातच करिअर करण्याचा सल्ला देण्यात आला.
नीरज चोप्रा याने विविध स्पर्धेत भाग घेऊन देशाची मान उंचावली आहे. सर्वात आधी 2016 मध्ये नीरज चोप्रा याने दक्षिण आशियाई स्पर्धेत सुवर्णपदक पटकावले. 2017 मध्ये आशिया चॅम्पियनशिप स्पर्धेतही सुवर्णपदकावर नाव कोरले. 2018 मध्ये आशिएन गेम्ससोबत राष्टमंडल खेळातही सुवर्णपदक पटकावले. आतापर्यंत नीरज चोप्रा याने सात सुवर्णपदकावर नाव कोरले आहे. 2020 मध्ये नीरज चोप्रा याने ऑळम्पिक स्पर्धेत सुवर्णपदक जिंकून इतिहास रचला. त्यानंतर लहानांपासून थोरामोठ्यापर्यंत सर्वजण नीरज चोप्रा याचे फॅन झाले. 2022 मध्ये डायमंड स्पर्धेतही नीरज याने सुवर्णपदक जिंकले. नीरज चोप्रा याने 89.94 मीटर इतका दूर भालाफेक करत रेकॉर्ड केला. पण तो इतक्यावरच थांबला नाही, त्याला 90 मीटरपेक्षा दूर भाला फेकायचा आहे. स्वीडन येथे डायमंड लीग 2022 स्पर्धेत नीरज चोप्रा याने 89.94 मीटर दूर भाला फेकत सुवर्णपदकावर नाव कोरले होते. त्यासोबत त्याने फिनलँडमध्ये पावो नुरमी गेम्समध्ये केलेला स्वतःचा विक्रम मोडीत काढला. फिनलँडमध्ये नीरज चोप्रा याने 89.30 मीटर दूर भाला फेक केली होती.
नीरज याने 88.67 इतका दूर भालाफेक करत 2023 मध्ये दोहा डायमंड लीग स्पर्धेत सुवर्णपदकावर नाव कोरले होते. पहिल्याच प्रयत्नात नीरज याने सुवर्ण जिंकले होते.

# चंद्रयान ३ नंतर पुन्हा एक अवकाश मोहीम

## इस्त्रोची 'आदित्य L1'-सूर्य मोहीम

आधुनिक केसरी न्यूज

**प्रा. सुरेश चोपणे**

**चंद्रपूर :** भारताच्या जगप्रसिद्ध इस्त्रो या खगोल संस्थेने चंद्रयानाच्या यशस्वी अभियाना नंतर लगेच आदित्य-एल.१ हे अभियान सूर्याकडे पाठवायचे ठरवले असून ते २ सप्टेंबर २०२३ ला प्रक्षेपित करण्यात येणार आहे. ६ वर्षे चालणाऱ्या ह्या मोहिमेत ७ वैद्न्यानिक उपकरणे असून ती सूर्याच्या जडण-घडणाचा, वातावरणाचा, गुरुत्वाचा, त्यावरील सौर वादळे, सौरवात ह्यांचा अभ्यास करणार असून ह्या मोहिमेमुळे पृथ्वीच्या वातावरणावर आणि यंत्रावर होणाऱ्या हानिकारक प्रभावाचा परिणाम कमी करण्यासाठी मोठा उपयोग होणार आहे. आदित्य एल १ मोहीम-खर तर ह्या मोहिमेची संकल्पना २००८ मध्ये मांडली गेली होती. निधी मात्र २०१९ मध्ये मिळाला. भारताच्या दृष्टीने अतिशय प्रतिष्ठेची आणि महत्वाची ही ६ वर्षे सुरु राहणारी मोहीम जगात भारताची मान उंचावणारी ठरणार आहे.आज अमेरिका,युरोप आणि जपान ह्या देशानीच सूर्य मोहिमा केल्या असून आता अशी सूर्य मोहीम करणारा भारत हा चोथा देश ठरेल. ह्या मोहीमेत इस्त्रो सोबत आयुका-पुणे आणि भौतिक अनुसंधान प्रयोगशाळा ह्यात सहभागी आहेत ह्या मोहिमेत ७ वैद्न्यानिक उपकरणे असून ते घेवून जायला आदित्य यानाला पृथ्वी पासून १५ लाख किमी अंतरावर लॅंग्रेज पोइंट वर हालो ओर्बिटमध्ये स्थिर केल्या जाईल.आणि हे अंतर पार करायला आदित्यला ३ महिने किंवा १०९ दिवस लागेल. सूर्याला ४.५ बिल्लीयन वर्षे झाली असून तो आपल्यापासून १५ कोटी किमी अंतरावर आहे.त्याचे गर्भातील तापमान १५ दशलक्ष डिग्री सेल्सियस तर बाहय आवरणाचे ५५०० डिग्री सेल्सियस आहे आपल्या जवळील अतिशय महत्वाचा आणि पृथ्वीवर जीवन देणारा आणि सतत परिणामकारक घटक आहे. पृथ्वी वर सूर्याचे वातावरणाचा,तापमानाचा आणि गुरुत्वाचा सतत परिणाम होत असतो.सौर ज्वाळा, सौर वाताचा पृथ्वीच्या वातावरणावर आणि हवामानावर, सजीव सृस्टीवर आणि इलेट्रीक, इलेक्ट्रोनिक्स उपकरणावर वाईट परिणाम होतो. जर सौर वादळांची,विकीरनांची आधीच माहिती मिळाली तर हे धोके कमी करता येईल, ह्याच सोबत सूर्याच्या जडण घडणीचा अभ्यास करण्यासाठी ही सौर मोहीम आखल्या गेली आहे.

### आदित्यची वैज्ञानिक उपकरणे

आदित्य एल १ ही एक सौर वेधशाळा असून त्यात ७ वैज्ञानिक उपकरणे आहेत . त्यांचे एकूण वजन २४४ किली असेल .सतीश धवन अवकाश केंद्रातून पी .एस .एल .व्ही . रोकेटच्या माध्यमाने आदित्य यानाला अवकाशात सोडले जाणार असून ते ६ वर्षे तिथे वैद्न्यानिक प्रयोग करणार आहे .त्यात ७ उपकरणे असतील त्यात १ )व्हीझीबल एमिशन लाईन करोनाग्राफ २ ) सोलार अल्ट्राव्हायलेट इमेझिंग टेलेस्कोप ३ ) आदित्य सोलार विंड पार्टिकल एक्सपेरीमेंट ४ ) प्लाझ्मा अँनालायझर पकेज ऑफ आदित्य ५ ) सोलर लो एनर्जी एक्स रे स्पेक्ट्रोमीटर ६ ) 105-हाय एनर्जी एल वन ऑर्बिटीग एक्सरे स्पेक्ट्रोमीटर ७ ) मॅग्नेटोमीटर अश्या ७ वैद्न्यानिक उपकरणांचा समावेश आहे .




यातील पार्टिकल डीटेक्टर उपकरणांच्या माध्यमातून आदित्य सूर्याचे फोटोस्पियर, क्रोमोस्पियर आणि कोरोनाचा अभ्यास करेल तर ४ उपकरनाचे सतत लक्ष सूर्याकडे लागले असेल आणि उर्वरित ३ उपकरणे तेथील पदार्थ, विकीरनांचा अभ्यास करेल .

लांग्रेन पोइंट L1 .काय आहे ? ह्या उपग्रहाला आदित्य L 1 असे का म्हटले आहे ह्याचे उत्तर म्हणजे- सूर्य आणि पृथ्वी च्या दरम्यान अशी काही ( L1 ते L5 ) एल १ ते एल ५ स्थळे आहेत जिथे सूर्य आणि पृथ्वीच्या गुरुत्वाकर्षणाचा सॅटेलाईट सारख्या वस्तूंवर शून्य प्रभाव पडतो किंवा असे स्थळ जिथे दोन्ही खगोलीय पिंडाच्या मध्ये एक गुरुत्वाची सीमा असते त्या स्थळांना लॅंग्राज पोइंट( असे म्हणतात . या स्थळी कोरिओलीस आणि सेंट्रीफुगल प्रभावामुळे उपग्रह स्वतंत्रपणे ह्या पोकळ भागात भ्रमण करू शकतात अश्या भ्रमणाला हालो ओर्बिट असे म्हणतात .आपले आदित्य L 1 ह्या अश्याच ठिकाणी पृथ्वीपासून १५ लाख किलोमीटर अंतरावर सतत विना अडथळा सूर्याकडे लक्ष ठेवून राहणार आहे . अमेरिकेचे सोहो हे सूर्ययान ह्याच L1 स्थळावर तर वेब अवकाश दुर्बीण L2 स्थळावर कार्य करीत आहेत .

# 'अजित पवारांच्या सभेला बळजबरीने लोक आणले'

आधुनिक केसरी न्यूज


**नागपूर :** उद्धव ठाकरेंच्या सभेत जिवंतपणा होता, तर अजित पवारांच्या



सभेत मुर्दाडपणा होता. कारण त्यांच्याकडे सांगण्यासारखे नाही, हे लोक जनतेला काय सांगणार? बेईमानी केली, पक्ष फोडला, जनतेसोबत दगाबाजी केली, हे सांगणार काय? अशी टीका विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी केली. बीडमध्ये अजित पवारांच्या सभेत बळजबरीने आणलेली लोक होते. जनता आता त्यांच्यावर विश्वास ठेवायला तयार नाही आज नागपुरात ते पत्रकारांशी बोलत होते. राष्ट्रवादी फोडणाऱ्याची आता जिरवायची, असा निर्णय जनतेने घेतला आहे. त्यामुळे त्यांचे आता काही खरे नाही.
प्रफुल्ल्ल पटेल यांच्याबाबत बोलताना म्हणाले, निवडणूक आयोग काय निर्णय देणार आहे, तो निर्णय गुप्त पद्धतीने झालाही असेल आणि तो निर्णय प्रफुल्ल्ल पटेल यांना माहीत असेल म्हणून ते तसे बोलत आहेत.






विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

राजेश आणि पिंकी ही नव्या पिढीतील मुले होती. ज्ञान आणि माहिती मिळवण्याची उत्सुकता त्यांना स्वस्थ बसू देत नव्हती. सतत कुठली तरी गोष्ट जाणून घेण्याचं कुतूहल त्यांना असायचं. त्यांच्या या ज्ञानयज्ञात भर घालण्याचे कार्य श्यामराव आणि श्यामलाताई त्यांच्या परीने करीतच होते. कधी कधी भगवानकाका त्यात मोलाची भर घालत. तशातच २३ ऑगस्ट २०२३ चा दिवस उजाडला. या दिवशी भारत आपले चंद्रयान-३ चंद्रभूमीवर उतरवणार होता. त्यामुळे या ऐतिहासिक घटनेचे थेट प्रक्षेपण दूरदर्शनवर सुरु होते. सगळ्यांच्याच नजरा समोरच्या पडद्यावर खिळून होत्या. क्षणाक्षणाला चंद्रयान आणि चंद्राचा पृष्ठभाग यातील अंतर कमीकमी होत होते. संध्याकाळी सहा वाजून चार मिनिटांनी ' विक्रम ' लॅण्डर अलगदपणे चंद्राच्या जमिनीवर उतरले. १४ जुलै २०२३ रोजी सुरु झालेली ही भारताची चंद्रझेप २३ ऑगस्टला यशस्वीपणे समाप्त झाली. बंगळुरूच्या नियंत्रणकक्षात काहीशा तणावात असलेल्या इस्त्रोच्या वैज्ञानिकांचे चेहरे आनंदाने फुलून आले. टाळ्यांचा प्रचंड कडकडाट झाला. काहींच्या डोळ्यातून आनंदाश्रू ओघळले. भारताने मिळवलेला हा ऐतिहासिक विजय होता. अजूनपर्यंत चंद्राच्या ज्या दक्षिण ध्रुवावर पाऊल ठेवणे कोणत्याही देशाला शक्य झाले नव्हते त्या चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर भारताने आपले यान यशस्वीपणे उतरवले होते. अमेरिका, रशिया, चीन या देशांच्या पंक्तीत आता भारत सन्मानाने जाऊन बसला होता. संपूर्ण देशात या अभूतपूर्व यशाने आनंदाचे वातावरण होते. ठिकठिकाणी लोक विजयोत्सव साजरा करीत होते. भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी हे यावेळी ब्रिक्स परिषदेसाठी दक्षिण आफ्रिकेतील जोहान्सबर्ग इथे होते. त्यांनी तिथूनच आपल्या देशातील वैज्ञानिकांशी आणि देशवासियांशी संपर्क साधला. आपल्या वैज्ञानिकांचे आणि देशातील जनतेचे अभिनंदन केले. या आनंदाच्या प्रसंगात त्यांनी अखिल विश्वालाही आपल्यामध्ये सामील करून घेतले. हे यश केवळ भारताचे नाही तर अखिल मानवजातीचे आहे असे गौरवोदगार त्यांनी काढले. भारतीयांची छाती अभिमानाने फुलून यावी असा पहिला संदेश यानाने पाठवला. ' मी माझ्या लक्ष्यापर्यंत पोहोचलो आहे आणि माझ्यासोबत तुम्हीसुद्धा ! श्यामराव आणि श्यामलाताईंचे डोळे या आनंदाच्या क्षणाने नकळत पाणावले. मुलांनी टाळ्या वाजवल्या. श्यामलाताईंनी घरातील सगळ्यांच्या हातावर थोडी साखर ठेवली.



समृद्ध प्राचीन भारत



# आनंदी पहाट

## सोशल मीडियाचे व्यसन घातकच

आधुनिक केसरी



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

समाज माध्यमांव्दारे आपली व्यक्तिगत स्वरूपातील कोणती माहिती किती द्यायची ह्याची सतत जाणीव होणे आवश्यक असते. अनेकदा आपले लोकेशन फेसबुकवर जाहीर केले जाते, आपण परगावी गेल्याच्या संदर्भातील पोस्टमुळे ही माहिती जगजाहीर होते आणि त्यामुळे अशा ठिकाणी घरफोड्या होतात. अलीकडच्या काही काळापासून अनेकांना आभासी दुनियेचे प्रचंड आकर्षण वाटू लागले आहे. समाज माध्यमांच्याइतका विश्वास इतरांवर तर लांबच परंतू स्वतःवर देखील ठेवला जात नाही. अनेकदा सोशल मिडीयाच्या माध्यमातून झालेला त्रास, मनस्ताप, दुःख, नुकसान, फसवणूक आणि कालांतराने पश्चाताप भोगण्याची वेळ अनेकांवर येत असल्याचे आपण सर्वच ऐकत आहोत. सोशल मिडीयाच्या आहारी जाण्यामुळे आणि फसगत झाल्यामुळे सोशल मिडिया आपल्याला सोसत नाही, हे अभ्यासपूर्वक समजून घेण्याची गरज असते. गुगल काहीवेळा गुगली टाकत असते, हे लक्षातच घेतले जात नाही. सोशल मिडिया, गुगल, विविध वेबसाईट अनेकदा आपल्याला अत्यंत योग्य, चांगली, गरजेची, आवश्यक माहिती पुरवतात, परंतू नेहमीच तसे घडेल असेही नाही. अनेकांना गुगलवर एखादा पत्ता शोधताना मनस्ताप झाल्याचे अनुभवायला येत असते, समाज माध्यमांव्दारे केल्या जाणाऱ्या खोट्यानाट्या जाहिरातींना भुलून आजवर अनेकांची आर्थिक, मानसिक, शारीरिकदृष्ट्या फसवणूक होत आहे. काही व्यावसायिक वेबसाईटच्या माध्यमातून खोटे आर्थिक व्यवहार करून, बँक खात्याच्या गोपनीय माहितीच्या आधारे ती खातेदाराकडून लबाडीने मिळवून नकळत आर्थिक फसवणूक केली जात असल्याचेही आपण ऐकत आहोत. अर्थात, ह्या अभासी दुनियेत सहभागी व्हायला काहीच हरकत नाही, परंतू प्रथमतः त्याची सविस्तर माहिती करून घेऊन, सखोल अभ्यास करून आणि योग्य दक्षता बाळगून मगच सावधपणे विचार, वर्तन आणि व्यवहार करणे हिताचे ठरते.



आधुनिक केसरी

**साधु या संवाद | मौनातून ||**

तुझ्या संगतीने | सुखावलो देवा ||
पावलो विसावा | तुझे ठायी ||१||
देखिता चरण | वेडलागे मना ||
आनंद मावेना | त्रिभुवनी ||२||
अभंगाचा सूर | येता ओवी संगे ||
अद्वैतात रंगे | आत्माराम ||३||
नको धनराशी | संसाराचा नाद ||
साधु या संवाद | मौनातून ||४||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

# निरुपण

आधुनिक केसरी

जगद्‌भवेत् सहाय्यार्थं कृपया जगदम्बिके |
धर्मकामार्थसिद्ध्यर्थं दुर्गां देवीं नमाम्यहम्
|| ७७ || हे जगदंबिके, तुझ्या कृपेने जग माझे सहाय्य करण्यासाठी सिद्ध व्हावे. धर्म, काम, अर्थ यांच्या सिद्धीसाठी मी तुला दुर्गा देवीला नमन करतो.




डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

# घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

बैठे दिव्य जहाज पर, गमन है आपे आप ।
उतर पार संसार से, हंस पहुँच जहँ आप
।।४९।।(स्वर्वेद पंचम मण्डल षष्ठ अध्याय)
०५/०६/४९

मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
विहंगम योगातील भक्ती ही चेतन भक्ती आहे. या भक्ती रूपी जहाजावर चढल्याने आपल्या चेतन प्रदेशात स्वाभाविक, सहज स्वरूपात गमन (प्रस्थान) होऊ लागते, आणि आत्मा प्रकृतीच्या पलीकडे उतरून, आपल्या पूर्ण धनी सर्वेश्वर, जगदाधारा जवळ जाऊन पोहोचतो. चेतन मण्डलाची प्राप्ती झाल्यावर, सुरतीच्या स्थिरतेमुळे स्वयं आत्म्याच्या सर्व शक्ती आपल्या प्रदेशाकडे गमन करू लागतात.



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्‌गुरू सदाफल देवजी महाराज

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअ‍ॅप करा ८५५४८८३१६६.

# आत्मदर्शन

आधुनिक केसरी




सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

सद्‌गुरूचे वचन काय आहे! आपण जेव्हा सद्‌गुरूच्या वचनांचा निजध्यास घेतो,सतत संत वचनावर जगण्याचा प्रयत्न तर करतो पण ज्यांच्या कडे हे विचार नाहीत ते लोक तुमच्या विचारतील की, "सद्‌गुरू, सद्‌गुरू" म्हणतात पण त्यांचे विचार काय आहेत हे आम्हाला सांगा. तर मित्रांनो अगदीच सोप्पं आहे सद्‌गुरू वचन, कसे ते बघा. सकाळी उठल्यापासून ते रात्री झोपेपर्यंत दैनंदिन कामे करत असताना त्यासाठी वेगळा वेळ काढावा लागत नाही हे याठिकाणी आवर्जुन सांगते.जो सद्‌गुरूच्या विचारांपासून जरा सुध्दा विचलित होत नाही, जो सतत सद्‌गुरू चे वचन हृदयामध्ये घट्ट धरून ठेवतो, त्यांचे वचन, श्रवण, मनन, चिंतन अत्यंत आदराने करतो, पुन्हा पुन्हा करतो. ह्यालाच सद्‌गुरू चे वचन म्हणतात. या माया पाशात जो गुरफटून जातो तो मोक्षाचा अधिकारी होतो. "आत्मदर्शी अवस्थेचे वर्णन" ज्या अनुभवामध्ये द्वैत नाही तेथे पूर्वपक्ष व उत्तरपक्ष दोन्ही मध्ये विलीन होतात.तिथे लक्ष व अलक्ष या दोन्ही क्रिया शिल्लक रहात नाहीत.

# आनंदापासून दूर करते ती माया

आधुनिक केसरी

वस्तू आहे तशी न दिसता विपरीत दिसणे म्हणजे माया होय. माया म्हणजे जी असल्याशिवाय राहात नाही, पण नसली तरी चालते; उदाहरणार्थ, छाया. माया ही नासणारी आहे. ती जगते आणि मरते. मला विषयापासून आनंद होतो; पण तो आनंद भंग पावणारा आहे. आनंदापासून मला जी दूर करते ती माया. आपल्याला विषयापासून शेवटी दुःखच येते, हा आपला अनुभव आहे. माया आपल्याला विषयात लोटते; विषयांचे आमिष दाखवून चटकन् निघून जाते. आहे त्या परिस्थितीत चैन पडू न देणे, हेच तर मुळी मायेचे लक्षण आहे. पैसा हे मायेचे अस्त्र आहे. मायेचे थोडक्यात वर्णन करायचे म्हणजे, भगवंतापासून मला जी दूर करते ती माया. भगवंताची शक्ती जेव्हा त्याच्याच आड येते, तेव्हा आपल्याला ती माया बनते, आणि तिचे कौतुक जेव्हा आपल्याला वाटते तेव्हा ती त्याची लीला बनते. एक भगवंत माझा आणि मी भगवंताचा, असे म्हटले म्हणजे मायेचे निरसन झाले. मायेचा अनर्थ माहीत असूनही तो आपण पत्करतो, याला काय करावे ? जगाचा प्रवाह हा भगवंताच्या उलट आहे. आपण त्याला बळी पडू नये. जो प्रवाहाबरोबर जाऊ लागला तो खडकावर आपटेल, भोवऱ्यात सापडेल, आणि कुठे वाहात जाईल याचा पत्ता लागणार नाही. आपण प्रवाहात पडावे पण प्रवाहपतित होऊ नये. आपण प्रवाहाच्या उलट पोहत जावे; यालाच अनुसंधान टिकविणे असे म्हणतात. भुताची बाधा ज्या माणसाला आहे त्याला जसे ते जवळ आहे असे सारखे वाटते, तसे आपल्याला भगवंताच्या बाबतीत झाले पाहिजे. परंतु बाधा ही भीतीने होते; त्याच्या उलट, भगवंत हा आधार म्हणून आपल्याजवळ आहे असे वाटले पाहिजे. मनात वाईट विचार येतात, पण त्यांच्यामागे आपण जाऊ नये, मग वाईट संकल्प - विकल्प येणार नाहीत. सर्वांना मी ‘ माझे ’ असे म्हणतो, मात्र भगवंताला मी ‘ माझा ’ असे म्हणत नाही; याला कारण म्हणजे माया. वकील हा लोकांचे भांडण ‘माझे’ म्हणून भांडतो, पण त्याच्या परिणामाचे सुखदुःख मानीत नाही, त्याचप्रमाणे, प्रपंच ‘ माझा ’ म्हणून करावा, पण त्यामधल्या सुखदुःखाचे धनी आपण न व्हावे. खटल्याचा निकाल कसाही झाला तरी वकिलाला फी तेवढीच मिळते. तसे, प्रपंचात प्रारब्धाने ठरवलेलेच भोग आपल्याला येत असतात. आपले कर्तव्य म्हणून वकील जसा भांडतो, त्याप्रमाणे कर्तव्य म्हणूनच आपण प्रामाणिकपणे प्रपंच करावा. त्यामध्ये भगवंताला विसरू नये, अनुसंधान कमी होऊ देऊ नये, कर्तव्य केल्यावर काळजी करू नये, म्हणजे सुखदुःखाचा परिणाम आपल्यावर होणार नाही. हे ज्याला साधले त्यालाच खरा परमार्थ साधला.



# सदगुरुंचा महिमा

आधुनिक केसरी



विनायक दि.पत्की
संपर्क क्र. ९४२२२४२५१७

हा प्रश्न सतत त्यांना विचारीत राहिले म्हणजे आपोआप आपल्यातील अंतर निश्चितच कमी व्हावयास सुरुवात होईल. माझे आयुष्य किती ते मला माहित नाही. माझा जन्म कोणत्या कार्यास्तव झाला हेही मला माहित नाही. मी कोण ? कुठला ? हेही माहित नाही.मला कोठे पोहचायचे आहे ? त्यासाठी कोठून सुरुवात करावी ?कशी करावी ? माझी पात्रता ती काय ? मी कसे वर्तावे ते मला समजत नाही. मनातील सर्व प्रश्नांचे समर्पक उत्तरे मी कोठे शोधावीत ? आज मज जवळ प्रचंड अज्ञान आहे हीच माझी ओळख असल्याने जगाच्या दृष्टीने मी तुच्छ झालो आहे. मला सन्मानाने , स्वाभिमानाने जगण्याचा काही मार्ग कोण दाखवेल ? माझ्या अज्ञानामुळे मी प्रचंड घाबरलो आहे. त्यामुळे मी तणावपूर्ण मानसिकतेमध्ये जगत आहे. हे हालाखीचे जीवन जगत असल्याने मी आज जे माझ्या अल्प बुद्धीनुसार कार्य करत आहे ते योग्य किती ? अयोग्य किती ?अयोग्य कार्यापासून मी मुक्तता कशी मिळवावी म्हणजे मला तुम्ही दिलेल्या जीवनाचा सदुपयोग करता येईल ?

# निवडक सुभाषिते

आधुनिक केसरी

सत्येन धार्यते पृथ्वी सत्येन तपते रविः ।
सत्येन वायवो वान्ति सर्वं सत्ये प्रतिष्ठितम् ॥

सरलार्थ – सत्याने पृथ्वीचे धारण होते. सूर्य सत्याने तापतो. सत्याने वारे वाहतात. सर्व काही सध्याच्या ठिकाणीच प्रतिष्ठित आहे.

स्पष्टीकरण – मानवी जीवनात जसे एक सत्य असते, तसेच या विश्वात एक वैश्विक सत्य असते. त्याला 'ऋत' म्हणतात. ऋत म्हणजे विश्वाचे नियम होत. या नियमांनीच पृथ्वी अधांतरी फिरत राहते. सूर्य जळत, तापत राहतो. वाऱ्यालाही वर सांगितलेल्या ऋताचे नियम लागू असतात. हे जाणून माणसाने आपले सत्य आचरावे. या सत्यामुळे मानवी व्यवहार सुरळीत चालू शकतील.

पं. महादेवशास्त्री जोशी, पुणे

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
मंगळवार, २९ ऑगस्ट २०२३
adhunikkesari.com Adhunik Kesari


# खासदार भावना गवळी यांच्या पाठपुराव्याला यश


## वर्धा-यवतमाळ- नांदेड रेल्वेमार्गाचे काम अंतिम टप्प्यात

आधुनिक केसरी न्यूज

**वसंत खडसे**

**वाशिम :** वाशिम यवतमाळ लोकसभा मतदार संघाच्या खासदार भावना गवळी यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे वर्धा यवतमाळ नांदेड हा रेल्वेमार्ग पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ' राष्ट्रीय प्रकल्प ' म्हणून घोषित केला होता. परिणामी या रेल्वेमार्गाला राष्ट्रीय प्रकल्पाचा दर्जा मिळाल्यामुळे, मध्यंतरी निधी अभावी रखडलेल्या कामाला गती मिळाली असून, सद्यस्थितीत सदर मार्गाचे काम अंतिम टप्प्यात आले आहे. २०२४ पर्यंत हा रेल्वे मार्ग सुरू होणार असल्याने विदर्भ, मराठवाड्याच्या विकासासाठी मोठी उपलब्धी होणार आहे. त्यामुळे विदर्भासहित मराठवाड्यातील सर्व सामान्य जनता खासदार भावना गवळी यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याची फलश्रूती झाली असल्याचे बोलत आहेत.

खासदार भावना गवळी यांनी केवळ आपल्या वाशिम यवतमाळ मतदारसंघाच्या विकासासाठीच नव्हे; तर विदर्भ मराठवाड्याच्या विकासाला चालना मिळावी या दृष्टिकोनातून वर्धा, यवतमाळ, नांदेड हा नवीन



राष्ट्रीय रेल्वेमार्ग प्रकल्प म्हणून घोषित करण्यासाठी, प्रत्यक्ष पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली होती. सदर भेटीदरम्यान या रेल्वे मार्गाचे काम कसे असावे, शिवाय विदर्भातील काही जिल्ह्यासोबतच मराठवाड्याच्या विकासात सुद्धा मोठी भर पडणार असल्याची महत्त्वपूर्ण बाब पंतप्रधान यांच्या निदर्शनात आणून दिली होती. त्याच बरोबर कर्नाटक, आंध्र प्रदेश, तेलंगणा राज्याला दळणवळणाचे साधन म्हणून हा रेल्वेमार्ग महत्त्वाची भूमिका बजावणार असल्याचे खासदार गवळी यांनी आवर्जून सांगितले होते. परिणामी त्यांच्या या मागणीची पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्वरित दखल घेऊन, सदर रेल्वेमार्ग राष्ट्रीय प्रकल्प म्हणून घोषित केला होता. एवढेच नव्हे; तर या रेल्वेमार्गाच्या विकास कामाला गती देण्यासाठी करोडो रुपयाचा निधी सुद्धा उपलब्ध करून दिला. सदर रेल्वेमार्ग पंतप्रधान कार्यालयातील प्रगती पोर्टलवर समाविष्ट करण्यात आल्यामुळे, वर्धा यवतमाळ, नांदेड या २८४ किलोमीटरच्या रेल्वेमार्गाचे काम जलद गतीने सुरू झाले. सद्यस्थितीत रेल्वेमार्गाचे काम अंतिम टप्प्यात आले असून, त्याची नुकतीच परीक्षण चाचणी सुद्धा घेण्यात आली आहे. २०२४ पर्यंत वर्धा ते कळंब पर्यंत रेल्वेगाडी धावणार असल्याचे सूतोवाच देखील रेल्वेच्या सूत्रांनी केले आहे. परिणामी खासदार भावनाताई गवळी यांच्या कर्तव्यनिष्ठ भूमिकेचे विदर्भ मराठवाड्यातून स्वागत होत आहे.



खा . भावनाताई गवळी यांनी अकोला पूर्णा रेल्वे मार्गाचे रुंदीकरण करून नागपूर ते मुंबई, मध्यप्रदेश, छत्तीसगड पर्यंत जोडून मागासलेल्या आत्महत्याग्रस्त जिल्ह्यांना विकासाची एक नवी संधी उपलब्ध करून दिली आहे . आणि आता राज्याचे मुख्यमंत्री व केंद्रीय रेल्वेमंत्री यांच्याकडे सातत्याने पाढपुरावा करून, प्रत्यक्ष पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांची भेट घेऊन वर्धा, यवतमाळ, नांदेड हा राष्ट्रीय रेल्वेमार्ग पूर्णत्वाकडे नेला आहे . खासदार गवळी या संयुक्त शिवसेनेत असताना त्यांनी अनेक विकासात्मक कामे केली आहेत . याच बळावर त्यांनी वाशिम यवतमाळ मधून विजयाची पंचमी साजरी केली आहे . आता तर, त्या भाजपसोबत घटक पक्ष असलेल्या शिवसेना पक्षात आहेत . त्यामुळे खासदार भावनाताई गवळी पुन्हा एकदा विजयाचा उत्तुंग षटकार ठोकणार असे राजकीय जाणकार बोलत आहेत .



# लोहा शहरातून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्गाची झाली दुरवस्था

आधुनिक केसरी न्यूज

**लोहा :** शहरातून जाणारा ३६१ राष्ट्रीय महामार्ग मागिल दोन वर्षापासून खड्डेमय झाला असुन, पादचारी, दुचाकी मोठ्या वाहन चालकासह आपला जीव मुठीत घेऊन शहरातुन मार्गक्रमण करावा लागत आहे, खड्ड्यांमुळे महामार्गाला पांदन रस्त्याचे स्वरुप आले आहे पाऊस झाला की, चिखलमय सदा सर्वदा धुळीचे लोट होत आसल्याने संबधीत गुत्तेदार व शासकिय यंत्रणेच्या व लोकप्रतिधिच्या "प्रतापा" "मुळे खड्ड्यात गेला रस्ता" म्हणन्याची वेळ लोह्याच्या नागरीकांना आली आहे. मागिल दोन वर्षा पुर्वी नांदेड लातुर राष्ट्रीय महामार्गाच्या कामास सुरवात झालीण् लवकरच शहरातुन जाणारा रस्ता "सुंदर" होण्याची "आशा" होती परंतु दुरुतीच्या नावाखाली वारंवार गिट्टी व मुरुम टाकुन शहरात प्रचंड धुळीचे साम्राज शिर्माण केले जात आहे तर थोडा ही पाऊस झाला की चिखलमय पांदन रस्त्याचे स्वरुप येत असुन, पुर्णपणे "खड्ड्यात हरवलेल्या" महामार्गावर मुरुम, गिट्टी, दगडाची चुरी टाकल्याने अनेकजण गंभीर जखमी झाल्याच्या घटना घडल्या असतानाही कोणतीच शासकीय यंत्रणा, लोकप्रतिनिधी, संबंधीत गुत्तेदार जीव ओतुन काम केल्याचे दिसुन आले नाहीत खड्ड्यांमुळे व धुळीमुळे पाऊस झाल्यास चिखलाने मेटाकुटीस आलेल्या शहर वासीयांची सुटका कधी होणार ही एक चिंतनाचीच बाब आहे.

मागिल तिन वर्षापासून शिवसेना पदाधिकाऱ्यानी नांदेड येथील महामार्ग प्राधिकरण कार्यालयास घेराव घातला असता थातुर मातुर डांबरीकरण करण केले नंतर वंचित बहुजन आघाडीच्या वतीने फुल बरसावो आंदोलन केली.असे अनेक संघटनांनी आंदोलने केली परंतु संबंधीत गुत्तेदारच्या वतीने महामार्गाच्या दुरुस्तीच्या नावखाली शासणाची लाखोंची लुट करत थातुर मातुर डागडूजी केली परिणामी पुन्हा काही दिवसात रस्त्यांची तीच परिस्थिती, तालुक्यातील संबंधीत महामार्ग प्राधिकरणाने व लोकप्रतिनिधींनी लक्ष देवून नागरिकांचे होणारे हाल थांबवावे, अशी मागणी जनतेतून होत आहे.

# नाशिक येथे स्व. मोहनलालजी बियाणी स्मृती व्याख्यानमालेचे आज तेरावे पुष्प


## खा. हेमंत गोडसे यांचे 'राजकारणाचे बदलते स्वरूप आणि वास्तव' वर व्याख्यान

आधुनिक केसरी न्यूज

**नाशिक :** दैनिक मराठवाडा साथीचे संस्थापक संपादक स्व. मोहनलालजी बियाणी ( काकाजी )



यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ सुरू असलेल्या व्याख्यानमालेचे तेरावे पुष्प खा. हेमंत गोडसे हे 'राजकारणाचे बदलते स्वरूप आणि वास्तव' या विषयावर गुंफणार आहेत. लोकनेते स्व. गोपीनाथ मुंडे इंजिनिअरिंग कॉलेज, सभागृह, कॅनडा कॉर्नर, नाशिक येथे मंगळवार, दि.२९ ऑगस्ट २०२३ रोजी दुपारी १२ वा. होणाऱ्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ॲड. तानाजीराव जायभावे, सहसचिव, क्रांतिवीर वसंतराव नाईक शिक्षण प्रसारक संस्था, नाशिक यांची उपस्थिती राहणार आहे. महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे व मराठवाडा साथीचे मुख्य संपादक चंदुलाल बियाणी यांच्या संकल्पनेनुसार या वर्षीपासून स्व. मोहनलालजी बियाणी ( काकाजी ) यांच्या स्मृत्यर्थ मासिक व्याख्यानमाला आरंभ करण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ व लोकनेते स्व.गोपीनाथ मुंडे इंजिनिअरिंग कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या व्याख्यानास उपस्थित राहण्याचे आवाहन संयोजक





दिलीप के. कोठावदे नाशिक शहर, जिल्हाध्यक्ष, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, छत्रपती संभाजीनगर जिल्हाध्यक्ष डॉ. प्रभू गोरे यांच्यासह कार्यकारिणीने केले आहे. प्रवेश सर्वांसाठी खुला आहे.






# उत्कृष्ट सेवा देण्याचा ध्यास घ्या : केळे

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** 'इज ऑफ लिव्हिंग' अर्थात जगण्याचा दर्जा वाढवण्यासाठी वीज हा अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. त्यामुळे ग्राहकांना दर्जेदार वीजपुरवठा करण्यासह सर्वोत्कृष्ट सेवा देण्याचा ध्यास महावितरणच्या अधिकारी-कर्मचाऱ्यांनी घ्यायला हवा, असे आवाहन महावितरणच्या छत्रपती संभाजीनगर परिमंडलाचे मुख्य अभियंता डॉ.मुरहरी केळे यांनी केले. बिडकीन येथील महावितरणच्या 33 केव्ही विद्युत उपकेंद्राला राज्यात दुसरे तथा मराठवाड्यातील पहिले आयएसओ 9001 : 2015 मानांकन मिळाले. त्यानिमित्त सोमवारी (28 ऑगस्ट) आयोजित समारंभात मुख्य अभियंता डॉ.केळे बोलत होते.

# चिंता वाढली

आधुनिक केसरी

देशात यंदा मान्सून रुसला आहे. अल निनोचा प्रभाव मान्सूनवर असल्याची भीती व्यक्त केली जात आहे. यावर्षी जून आणि ऑगस्ट महिन्यात दमदार पाऊस बरसलाच नाही. ऑगस्ट महिन्यात दीर्घ सुटी पावसाने घेतली आहे. देशात यंदा पावसाची तूट आहे. राज्यात सर्वत्र यंदा पावसाने सरासरी गाठली नाही. आता पुणे हवामान विभागाने मान्सून संदर्भात चिंता वाढवणारी बातमी दिली आहे. मान्सून आता हिमालयाच्या पायथ्यापर्यंत पोहोचला आहे. पश्चिमी वाऱ्याची गतीही कमी झाली आहे. यामुळे पुढील काही दिवस महाराष्ट्रात हलक्या पावसाची शक्यता आहे. परंतु मुसळधार पाऊस कोठेही होणार नाही. दोन दिवस कोकण, गोवा आणि मध्य महाराष्ट्रात काही ठिकाणी तुरळक पावसाची शक्यता आहे. राज्यात कोणत्याही भागात पावसाचा यलो किंवा ऑरेंज अलर्ट दिलेला नाही. देशात पश्चिमी वाऱ्याची गती कमी झाल्यामुळे पावसाचा वेग मंदावला आहे, असे पुणे हवामान विभागाच्या तज्ज्ञ शिल्पा आपटे यांनी सांगितले. यंदा पावसाची सरासरी गाठणे अवघड आहे. यामुळे राज्यावर दुष्काळाचं गडद सावट सध्या दिसत आहे. देशातील पूर्वोत्तर भारतात 17 टक्के कमी पाऊस झाला आहे. मध्य भारतात कमी पाऊस झाला आहे. या ठिकाणी आतापर्यंत 6 टक्के कमी पाऊस झाला आहे. तसेच यंदा दक्षिण भारतात 16 टक्के कमी पाऊस पडला आहे. देशाची एकंदरीत सरासरी पहिल्यास पावसाची तूट 7 टक्के आहे. मराठवाड्यात यंदा समाधानकारक पाऊस झाला नाही. त्यामुळे शेतीचा प्रश्न गंभीर बनला आहे. त्यात जलाशयांची स्थिती ही फार समाधानकारक नाही. धरणांमध्ये जलसाठा पुरेसा झालेला नाही. नांदेडमध्ये ऑगस्ट अखेरीस गतवर्षीच्या तुलनेत २०० मिलिमीटर पाऊस कमी झाला आहे. परभणीत हिच परिस्थिती आहे. खान्देशातील जळगाव, धुळे, नंदुरबार जिल्ह्यात दमदार पाऊस झालेला नाही. जळगाव जिल्ह्यातील भुसावळ, मुक्ताईनगर, रावेर, यावल अनेक तालुक्यांमध्ये दोन आठवड्यापासून पावसाने विश्रांती घेतली आहे.

# गुन्हेगाराला संरक्षण धर्माच्या नावाखाली


विनोद सदावर्ते
संपर्क क्र. 9130979300

आधुनिक केसरी

**माणसाने माणसासोबत माणुसकी व बंधुभावाने वागावे यालाच संस्कार म्हणतात. देशात महाराष्ट्र हे पुरोगामी विचार सरणीचे राज्य असुन सुशिक्षित व जागृत राज्य म्हणून महाराष्ट्राकडे पाहले जाते. काही धर्मांध व विषमतेच्या संस्कारातुन आलेल्या विकृतींना पुरोगामी विचाराची अँलर्जी आजही आहे तो भाग वेगळा. कारण बेडकाने कितीही फुगण्याचा प्रयत्न केला तरीही तो हत्ती होऊ शकत नाही. आणि हत्तीला कधीच डपक्यात लपवता येत नाही. शैक्षणिक साक्षरतेचे प्रमाण जास्त असुनही विचाराने अडाणी व अंपग असलेले लोक प्रत्येक वेळी धर्माचा आधार घेऊन स्वतः चा कमकुवत पणा अजून मजबूत करतात. ना विचार ना आचार, ना समज मेंदुचा पुर्ण वापर बंद करून सत्य, समता, माणुसकी, बंधुभाव विसरून केवळ धर्माच्या नावावर कोणतीही शहानिशा न करता दुसऱ्यांनी सांगितले म्हणून पेटून उठणारे लोक माणुस म्हणून संबोधन्याच्या सुद्धां लायकीचे नाहीत.**

भारतात प्रत्येक गोष्टी मध्ये विविधता आहे. तसीच विविधता ही धर्मामध्येही आहे. प्रत्येकाला आपापल्या धर्माचे आचरण, उपासना करण्याचे स्वातंत्र्य दिले आहे. परंतु धर्माच्या आधारावर ओळख दिली नाही. भारतात राहणाऱ्या प्रत्येक नागरिकांची ओळख हि देशाच्या नावावर आहे. थोडक्यात काय तर धर्माला मर्यादा घालून प्रत्येकाला देश व देशातील मानसाविषयी आपुलकी व जिव्हाळा निर्माण होऊन एकिच्या ताकतीने राष्ट्र बांधनी चांगल्या प्रकारे होऊ शकते या उद्देशाने सर्व जाती धर्माला समान स्थान, समान हक्क बहाल केले आहे. परंतु हेच समतेची भावना काही लोकांना आजही रुजणारी नाही. हजारो वर्षांपासून धर्मांध व धर्माच्या नावावर पोट भरणाऱ्या लोकांनी माणसाने माणसा जवळ येऊ नये, केवळ उच्च वर्णीय लोकांचे गुलाम म्हणून रहावे व कोणत्याही हक्क अधिकाराची अपेक्षा न करता विषमतेच्या उतरंडी मध्ये खितपत पडून केवळ लाचारी चे व गुलामीचे जिवन जगण्याची व्यवस्था निर्माण केली. लोकांना अज्ञानी व मानसिक गुलाम बनवून त्यांच्या टाळूवरचे लोणी खाऊन आपले वर्चस्व कायम ठेवण्याच्या विषमतावादी पिळावळी आजही लोकांना एक होऊ देत नाहीत. माणसाला माणसा सोबत माणसा सारखे जगु दिले जात नाही. धर्माच्या नावाखाली चुकीच्या घटनेचे समर्थन वा संरक्षण करून धार्मिक दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न केला जातो. सत्ता, पक्ष , संघटना आणि इलेक्ट्रॉनिक मीडीयाचा चुकिच्या पद्धतीने वापर करून आजही देशातील नागरिकांना समता, बंधुता, न्याय व स्वातंत्र्याची फळे चाखु दिली जात नाहीत. केवळ धर्माला समोर करून द्वेष पसरवण्याचे काम जोमात सुरू आहे. परंतु या मध्ये ज्या तरुणांचे नुकसान होते तेच तरुण धर्म व धर्माच्या तत्वज्ञाना पासुन दुर आहेत. केवळ व्यवस्थेकडून धर्माच्या नावाखाली पेटवले जाते परंतु धर्माबद्दल चांगले वाईट काहीच शिकवून लोकांना जागृत केले जात नाही. रंगावरून इतर धर्मीयांचा द्वेष करून देशभरात वादंग निर्माण करणारे, डोक्यात मेंदू नसणारे लोक जेव्हा स्वतः च्याच धर्मातील लोक रंगाचा अवमान करून धार्मिक पक्षामध्ये सक्रिय होतात तेव्हा मात्र सर्व सामान्य लोकांच्या, धर्माच्या ठेकेदाराच्या भावना दुखत नाहीत. सत्ताधारी लोक केवळ धर्म शब्दांचा वापरून करून धर्माची पोळी भाजण्यात मग्न आहेत. आणि ज्यांना धर्माच्या नावावर काहीच मिळत नाहीत, उलट जे समस्या ग्रस्त आहेत ते धर्म वाचायला निघाले. आणि ज्यांच्या जवळ पैसा सत्ता आहे त्यांची मुले विदेशात जाऊन उच्च शिक्षण घेत आहेत. बाकिचे बेरोजगार व महागाई ने होरपळणारे मात्र धर्म वाचण्याच्या नावाखाली सत्ताधारी लोकांना बळकटी देत आहेत. रंगामुळे भावना दुखत असतील तर कोणीही रंगाचा अवमान कोणीही केला तरी दुखायला पाहिजे पण येथे तसे नाही. येथे जात, धर्म बघून विरोध आणि आवाज उठवला जातो. एखादी गोष्ट चुकीची कि बरोबर ह्या साठी केवळ जातीचा आधार आहे. वंदे मातरम मुस्लीमांना आले नाही, किंवा म्हणले नाही तर एका बरोबर सर्वच देशद्रोही, आणि सत्तेतील किंवा सत्ताधारी धार्मिक संघटनेतील लोकांना वंदे मातरम आले नाही तर वेळेवर आठवत नसते म्हणून त्यांना देशप्रेमी ठरवले जाते. म्हणजे एकच कृत्य दोघांनी सारखेच केले तरीही त्याची जात धर्म पाहून आवाज उठवून, शिक्षेची मागणी होते. हत्या करणाऱ्या मध्ये आरोपी मुस्लिम असेल तर कठोर शिक्षेची मागणी होते आणि आरोपी धार्मिक संघटनेचा असेल तर प्रकरण दाबले जाते. असे अनेक प्रकरणे आहेत. म्हणजे केवळ सत्तेचा दुरुपयोग करून चांगले किंवा वाईट फक्त जाती धर्मावर ठरवले जाते, कर्मावर नाही. जातीव्यवस्थे नुसार एखाद्या खालच्या जातीतील व्यक्तीने गुन्हा केला तर वरच्या जातीतील लोक पेटून उठतात. आणि वरच्या जातीतील लोकांनी गुन्हा केला तर केवळ जात धर्म बघुन त्यांना संरक्षण दिले जाते. वाईट कृत्यांना, आरोपींना, पाठीशी घालण्याची शिकवण कोणत्याही धर्मात आहे असे दिसत नाही. म्हणजेच लोक केवळ धर्माच्या नावाखाली धर्म विरोधी वागून स्वतः च धर्माचा अवमान करतात. महाराष्ट्रात मागील काही दिवसांपासुन मागासवर्गीय समाजातील विषेशतः बौद्ध तरुणांच्या हत्याचे प्रमाण वाढले आहे. हत्या करण्यापत मजल का जाते तर कायद्याची भिती त्यांच्या मनात राहली नाही. कारण त्यांना माहिती आहे धर्माच्या नावाखाली संरक्षण मिळते. जेथे गाईच्या, शेणाच्या, मुत्राच्या विरोधात बोलता येत नाही, गाईसाठी माणसाला मारले जाते त्याच ठिकाणी निरापराध तरुणांच्या हत्या केल्या जातात. गाईला संरक्षण आहे पण तरुणांच्या हत्येनंतर ही न्याय नाही. आरोपींना जाती धर्माच्या नावाखाली वाचवण्याची शिकवण केवळ विकृतीतून येत असते. ती संस्काराची शिकवणच नाही. मागील काही दिवसापासून मागासवर्गीय तरुणांच्या हत्या होताना केवळ फुले शाहू आंबेडकर विचारधारेतील लोकच त्याचा निषेध करून आरोपींना शिक्षेची मागणी करत आहेत. परंतु जे धर्माच्या नावाखाली समाजात तेढ निर्माण करतात, व ज्यांना कर्मापेक्षा जास्त धर्म महत्त्वाचा वाटतो ते लोक खुणी तरुणांमुळे धर्म बदनाम होत आहेत म्हणून कधीच रस्त्यावर येत नाहीत वा खुणी तरुणांचा आणि धर्म जातीचा काहीच संबध नाही असे कधीच बोलत नाहीत याचाच अर्थ धर्माच्या नावाखाली त्यांना संरक्षण दिले जाते. म्हणजे खुण आणि अत्याचाराच्या घटना वाढत जात आहे. त्यामुळे राज्यात शांतता व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होत आहे. राज्याचे गृहमंत्री त्यांच्या धर्माच्या माणसाबद्दल एकही शब्द चुकिचा (अर्थात सत्य असेल तरीही) ऐकु शकत नाहीत. त्यासाठी ते रस्त्यावर येतात. त्याच गृहमंत्र्यांच्या काळात तरुणांच्या हत्या होतात. पण मंत्रीमहोदय कधीच म्हणत नाहीत ह्या हत्या खपवून घेतल्या जाणार नाही कींवा आरोपींना कठोर शिक्षा होईल. माणसाच्या जिवापेक्षा, नैतिक न्यायापेक्षा धर्माला जास्त महत्त्व दिले जाते याचाच अर्थ देशात अज्ञान, बेरोजगारी मोठ्या प्रमाणात आहे व लोकांकडे तर्क व विचार करण्याची क्षमता नाही हेच सिद्ध होते. धर्माच्या नावाखाली आरोपींना संरक्षण मिळते ह्याच बाबींचा गर्व अनेकांना आहे. परंतु यामुळे स्वतः च्याच धर्मात गुन्हेगारी प्रमाण वाढत चालले आहे यावर मात्र कोणाचेही लक्ष राहले नाही. सरकार निरपेक्ष असायला पाहिजे पण ज्यांच्या कडे समता, बंधुता न्याय व स्वातंत्र्य बहाल करण्याची नितीमत्ता च नाही ते सरकार निरपेक्ष न्याय करेल ही अपेक्षा फोल ठरते. सरकार आरोपींची जात धर्म बघून त्याच्या वर कार्यवाही करते म्हणुन तर वाईट विकृतींना उत आला आहे. एवढी वाईट विकृती झाली की स्वतः च्या धर्मातील मुल गुन्हेगार बनत चालले आहेत तरीही लोकांना त्याबद्दल जाणीव नाही यालाच तर माणसीक गुलामी म्हणतात. फुले शाहु आंबेडकर यांचे वैचारिक वारस आजही समाजात प्रबोधनाचे काम करत आहेत. परंतु जातीव्यवस्था, अंधविश्वास भोंदुगीरी या विरोधात आवाज उठवून माणुस व माणासाच्या समस्या केंद्र भागी ठेवून त्या सोडवण्याचे संविधानीक प्रयत्न करत आहेत. जेव्हा हे वैचारिक लोक समाजात कोणत्याही व्यक्तीवर अन्याय अत्याचार होऊ नये या भावनेने आवाज उठवतात तेव्हा मात्र त्यांना अनेक अडचणी निर्माण होतात. आरोपी मोकाट आणि न्याय माघणारे पोलीसांच्या ताब्यात अशी अवस्था होते. पोलीस सर्वतोपरी आपल्या परिने शांतता व सुव्यवस्था प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करतात परंतु राजकीय क्षेत्रातून आलेल्या दबाबामूळे बऱ्याच वेळा पोलीसांच्या प्रामाणिकतेवर प्रश्न उपस्थित होतो. सत्तेतील लोक जर आरोपींची जात धर्म बघून कृती करत असतील तर जागृत व समतावादी लोकांना रस्त्यावर उतरल्या शिवाय पर्याय राहणार नाही. आणि जेव्हा लोक न्यायासाठी रस्त्यावर उतरतील तेव्हा त्यांच्या हातून अनुचित प्रकार घडू शकतो. परंतु वैचारिक लोकांच्या हातुन अनुचित प्रकार घडू नये, संविधानीक मार्गाने का होईना न्यायासाठी कोणाला रस्त्यावर उतरावे लागु नये, कायद्याचा वचक हा गुन्हेगारां वर रहावा या साठी सरकार व धर्माचा गर्व असलेले लोक प्रयत्न करताना दिसत नाहीत. म्हणजेच गुन्हेगाराला संरक्षण धर्माच्या नावाखाली मिळते. आणि निर्दोष लोकांना जिव जातो व अराजकता निर्माण होते. धार्मिक दहशत निर्माण होण्याची भिती असते पण सरकार व जे स्वतः ला राष्ट्रभक्त समजतात ते लोक कधी छत्रपती शिवरायांच्या अवमानाबद्दल बोलत नाहीत, ते कधीच मनोहर कुलकर्णी ला अटक होण्यासाठी बोलत नाहीत, ते कधीच कुरूलकर यांच्या वर राष्ट्रद्रोहाचा खटला भरावा म्हणून बोलत नाहीत, गाईला मारणे पाप आहे तर माणसाला मारणेही पाप आहे असे कोणत्याही धार्मिक संघटना किंवा सरकार बोलत नाही याचा अर्थ धर्माच्या नावाखाली सर्व जन एकत्र येऊन विकृतींना सांभाळण्याचे काम करतात. परंतु मागासवर्गीय तरुणांवरचे हल्ले, महिलांवरील अत्याचार याला सरकारने आळा घातला नाही तर जनता रस्त्यावर उतरून सरकारला वठणीवर नक्कीच आणु शकते. त्यासाठी ईव्हीएम बंद होऊन बँलटपेपर निवडणुका व्हायला पाहिजे यासाठी ही आपल्याला रस्त्यावर उतरून मताधिकार संरक्षित करून लोकशाही वाचवावी लागेल तरच अन्याय अत्याचाराला आळा बसुन समाजात कायदा व सुव्यवस्था निर्माण होईल आणि धर्माच्या नावाखाली वाईट बाबींचे संरक्षणही होणार नाही.

# विवेक जागृत होणं हाच शिक्षणाचा मुख्य उद्देश असतो


गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

आधुनिक केसरी

**शक्ति बळ सामर्थ्य निर्माण होण्यासाठी शिक्षण व सत्याचा मार्ग समजण्यासाठी विवेक जागृत झाला पाहिजे विवेक जागृत होण्यासाठी शिक्षण हे अमृताची भुमिका बजावत .पण हल्ली आपण शिक्षणाला खुप हलक्यात घेतो .याचा अर्थ आपल्याला शिक्षणाचं मुळ समजलं नाही. शिक्षण हे वाघीणीचे दुध असुन ते जीवन उत्थानाच सर्व श्रेष्ठ आणि उत्कृष्ट असं माध्यम आहे.शिक्षणामुळे आपला विवेक जागृत होतो . आणि एकद विवेक जागृत झाला कि मग आपण जगातील कोणत्याही शक्तिला , सामर्थ्याला, वैभवाला घाबरत नाहीत. कारण सत्य हे कधीच घाबरत नसतं.**

त्याला भिती नसते आपली विवेक ही शक्ती जगातील सगळ्या शक्ति वर प्रभावी ठरते.सत्य असत्य या मधील फरक ओळखता येण त्याच बरोबर सत्य स्वीकारण्याच आणि असत्य नाकारण्याचा धाडस निर्माण होण्याची शक्ति म्हणजे विवेक आणि हाच विवेक जागृत होण्यासाठी शिक्षण हेच मुख्य माध्यम असत.शिक्षणाचं महत्त्व आणि उदेश हा जीवनात सार्थकी लागला पाहिजे असं खरया अर्थाने वाटतं असेल तर शिक्षणामुळे आपली चेतना आपला विवेक जागृत झाला पाहिजे.मुळात आपण शिक्षण कशासाठी घेतोय हा प्रश्न अगदी सहजपणे कोणालाही विचारला तर नौकरी रोजगार काही तरी पोटापाण्याचा प्रश्न मार्गी लागेल अथवा भौतिक सुविधा साधन संपदा अर्जित होण्यासाठी सहकार्य होईल हाच मुख्य हेतू ठेवून आपण शिक्षण घेत असतो. हेच उत्तर प्रथम दर्शनी आपल्याला सगळीकडे ऐकायला मिळेल या मध्ये अजिबात शंका नाही.पण शिक्षण म्हणजे फक्त नौकरी अथवा पोटा पाण्याची सोय हाच समज साध्यतरी सगळीकडे रूढ असला तरी सुद्धा आयुष्यात शिक्षणाचा उपयोग हा मुख्यत्वे चेतना जागृत होण्यासाठी असतो .आपला मेंदू आपली चेतना जागृत झाली तर आपल्यासाठी जगात असंभव असं काहीच उरत नाही .पण आपण खरया अर्थाने याच मुख्य उद्देश पासुन वंचित राहतो .आणि दुय्यम असणार्या उद्देशाला मुख्य समजुन मृग जळात अडकुन राहतो. उदात्त आति उदात्त हेतू धेय्य अर्जित करण्यासाठी असणार शिक्षण आपल्या मध्ये सामर्थ्य ताकद शक्ति निर्माण करत असतं पण आपण शिक्षण म्हणजे फक्त नौकरी एवढाच समज डोक्यात ठेवून वावरत असतो. सामर्थ्य शक्ति आणि ताकद याच महत्त्व जीवनात अनन्यसाधारण असं असतं पण हेच अनन्यसाधारण महत्त्व आपल्याला आपल्या मध्ये निर्माण करण्यासाठी शिक्षणाची खरी आवश्यकता आणि भुमिका समजणं गरजेच आहे.

आपण ही भूमिका जाणून घेण्यासाठी फार उत्सुक नसतो . नौकरी अथवा रोजगार कसा मिळेल आणि मार्क कसे मिळतील वाढतील एवढ्यापुरताच आपण शिक्षणासोबत जोडले जातो .आपण फक्त क्षणिक लाभ पाहते नौकरी एवढाच आपला वरकरणी उदेश असल्याने आपण शिक्षणातील अनमोल अमृता पासुन वंचित राहतो. कस्तुरी पोटात घेऊन फिराणारा मृग कस्तुरी पासुन वंचित असतो तशीच आपली सुद्धा काहिशी अवस्था आहे. शिक्षणाकडे



पाहण्याचा आपला दृष्टीकोन बदला पाहिजे आपण शिक्षणाकडे ज्या पद्धतीने पाहतोय त्याच पद्धतीने त्या मर्यादेत आपल्याला त्याचा लाभ होईल. शिक्षणाच्या प्रति आपण जेव्हा उदात्त आणि विराट दृष्टीकोन ठेवून ज्ञान अर्जित करू तेव्हा निश्चितच आपला विवेक जागृत होईल आणि शिक्षणाचा खर लाभ आपल्याला होऊन तेच ज्ञान लोक कल्याणासाठी करणी लागेल या मध्ये काही शंका नाही. जीवनाचं यथार्थ ज्ञान समजण्यासाठी शिक्षणाचा मुल्य आणि महत्व समजण्या बरोबरच शिक्षणाचा मुख्य हेतू आपल्याला आपल्या जीवनात साध्य करता आला पाहिजे.व त्याचा योग्य उपयोग करून घेऊन आपलं जीवन सार्थक करण्या बरोबरच आपण आपलं शिक्षण ज्ञान हे समाजाच्या देशाच्या हितासाठी सत्कारणी लगल पाहिजे.शिक्षण सत्कारणी लागण हे खुप महत्वाच आणि आवश्यक बाब असुन ते गरजेचे आहे. सत्य ओळखण्याची क्षमता ताकद निर्माण झाल्याशिवाय हे सगळं ईप्सित साध्य होणार नाही म्हणून सत्य जाणण्यासाठी शिक्षणाचा खरा उद्देश आपला विवेक जागृत झाला पाहिजे आणि तो जागृत करण्यासाठी शिक्षण घेताना क्षणोक्षणी जागृत असल पाहिजे.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# पड रं पान्या, पड रं पान्या, कर पानी पानी...

## दुष्काळ स्थिती उंबरठ्यावर : आधुनिक केसरी जनचर्चेत चिंताजनक प्रतिक्रिया

**प्यासा सावन :**
रिमझिम पाऊस पडे सारखा यमुनेलाही पूर चढे, पाणीच पाणी चहूकडे गं बाई गेला मोहन कुणीकडे..... अशा सुंदर ओळी लिहून पी. सावळाराम यांनी केलेले वर्णन नुसतेच आठवण करण्याची वेळ आलेली दिसत आहे. पावसाळ्याच्या दिवसांत या गीताची धून हमखास ऐकायला मिळत असे. तसाच पाऊस चहूकडे पाणी पाणी करीत पड़त होता. त्या पावसाला झालंय तरी काय..? असा धीरगंभीर वाटणारा प्रश्न आज सगळ्यांना सतावतो आहे की, सळसळणारा पाऊस कधी तरी बरसेल निदान मन तरी ओलेचिंब करेल ही आशा लावून बळीराजा चातकाप्रमाणे वाट पाहत आहे. ' मेघारे मेघारे मत परदेश जा रे.... हे गाणं गाताना वरून राजाला विनवणी करताना इथे तिथे सर्वत्र बरसून जा ही आर्जव मनाला स्पर्शून जाते.
हिंदोळ्यावर झोका घेता घेता बालपणीच्या कविता आठवल्यावर हिरवगार निसर्ग समोर दिसतो आणि आपसूक ' श्रावण मासी हर्ष मानसी हिरवळ दाटे चोहिकडे...' हे शब्द कानावर रुंजी घालतात परंतु, आजचे चित्र पाहून पावसाला झालंय तरी काय? हा प्रश्न पडतो. तेव्हा पड रे पान्या ,पड रे पान्या कर पाणी पाणी... या पावसाच्या विनवणी करणा-या लोकगीताची आठवण आल्याशिवाय राहत नाही.लोकप्रिय गायक प्रल्हाद शिंदे यांच्या त्या काळातील लोकगीतांचा उल्लेख आवर्जून करावा वाटतो आणि ही हाक वरून राजाने ऐकावी अशी अपेक्षा. **-वसंत राठोड, मुंबई**

**माणसाने निसर्गावर कुरघोडी करू नये... :**
जून ते सप्टेंबर हे चार महिने पावसाळ्याचे आहेत. आजघडीला जवळ जवळ तीन महिने उलटून गेले आहेत तरीही महाराष्ट्रातील काही भागात अजूनही म्हणावा तेवढा पाऊस पडलेला दिसत नाही. काही ठिकाणी घरासाठी घेतलेल्या बोरिंग आटल्या आहेत. हापसे बंद पडली आहेत. काही ठिकाणी धरणे,नदी व विहिरीतही पाणी नाही. विहिरींनीही तळ गाठला आहे त्यामुळे अनेक खेड्यातील माणसांना तर हंडाभर पाण्यासाठी वणवण भटकावे लागत आहे. जनावरांनाही पाणी पिण्यासाठी मिळत नाही. शेतातील पिकं करपून जात आहेत. ही विदारक भयानक परिस्थिती उघड्या डोळ्यांनी पाहवेनासी झाली आहे. त्यामुळे माणसाने निसर्गावर कुठल्याही प्रकारची कुरघोडी न करता, वृक्षतोड न करता निसर्गाला साथ द्यायला हवी. प्लॅस्टिक व इतर दूषित वातावरणामुळेही पाऊस पडेनासा झाला आहे. त्यामुळे माणसाने वृक्षारोपण करून पाण्यासंदर्भात नियोजन करायला हवे. सरकारनेही या गोष्टीकडे गांभीर्याने लक्ष देऊन
जनतेची होणारी तारांबळ थांबवायला हवी.
**प्रा. डॉ. सतीश मस्के, पिंपळनेर**
**ता.साक्री जि.धुळे**

आधुनिक केसरी

**यंदा पावसाने चक्क ओढ दिल्याने सर्वासमोर पाण्याचा चिंताजनक प्रश्न उभा राहिला आहे. पाऊस लांबल्याने पिकांना तांब्याचे पाणी देतानाचे चित्र बघून मन सुन्न होत आहे. भर पावसाळ्यात ही का परिस्थिती ओढावली? हा प्रश्न डोळ्यात खोलवर बोटे घालतो. म्हणूनच लोकप्रिय गायक प्रल्हाद शिंदे यांच्या पड रे पान्या, पड रे पान्या कर पाणी पाणी... या पावसाच्या विनवणी करणा-या लोकगीताची आठवण आल्याशिवाय राहत नाही. म्हणूनच आधुनिक केसरीत चिंताजनक प्रतिक्रिया विचार करण्यास भाग पाडतात...**

आधुनिक केसरी जनचर्चा

**झाडे लावून नियोजन करा... :**
पाऊसाचे पाणी आणि मनात गाणी हवी असतील तर,एक छोटसे काम करावे लागेल ते म्हणजे एक माणूस एक झाड दर वर्षी लाऊन त्याचे संगोपन आपल्या मुलासारखे करावे लागेल. मग हिरवी हिरवी झाडे पाहून ढग येतील पाऊस पडेल.,लावलेल्या रोपामुळे चमत्कार घडेल. नदी नाले व्हातील वसुंधरा नटलेली दिसेल. पशू पक्षी येतील आणि ताल सूर धरून गाणे गातील. कृती छोटी किमया मोठी असेच म्हणावे लागेल. पाऊस पडत नाही म्हणून फक्त चर्चा करून भागणार नाही तर आपल्यासाठी आणि पुढच्या पिढीसाठी रोपे लावून नियोजन करावे लागेल मग म्हणायची पाळी येणार नाही पड रे पाण्या पड रे पाण्या... - **सुधाकर देशमुख,**
**ममदापूर अंबाजोगाई**

**वरूणराजा मेहरबान हो... :**
पाऊस मागील अनेक वर्षांपासून हूलकावणी देत असल्याने जगाचा पोशिंदा असलेला शेतकरी पूर्णा गारद होत आहे.हवामान खाते केवळ अंदाज सांगून मोकळं होत आहे .खरिप आणि रब्बी हंगामातील हातातोंडाशी आलेला घास हिरावला जातो आहे.यावर्षी पावसाळ्याच्या प्रारंभी वरूणराजाने डोळे वटारल्याने पेरण्या खोळंबल्या. जूलै मध्ये अतिवृष्टीमुळे पिकांची नासाडी झाली. आता पावसाने डोळे मिटल्याने शेतकरी चिंताग्रस्त झाला आहे. शेतकऱ्यांच्या नजरा आता आकाशाकडे टक लावून आहेत. वरूणराजा कधी मेहरबान होईल याची प्रतीक्षा आहे.
**- बाबुराव पाटील,**
**भोकर जि. नांदेड**

**शासनासोबत सर्वांनीच पुढाकार घेऊ... :**
सध्या भरपावसाळ्यामध्ये सर्वत्र परिस्थिती पाण्यावाचून दुष्काळग्रस्त झालेली दिसत आहे. अल्प पाऊस पडला, आशेच्या किरणावर शेतकऱ्यांनी कर्ज काढून पेरण्या केल्या.पावसाने पाठ फिरवल्यामुळे पिकांना जगवण्यासाठी शेतकऱ्यांची धडपड सुरू केली आहे. पाऊस नसल्याने खरीपाचे पीक संकटात आले आहे .पाऊस न झाल्यास खरीप पिक हातातून जाण्याची भीती निर्माण झाली आहे. मराठवाडा नेहमीच पाणीटंचाईने दुष्काळग्रस्त राहिलेला आहे व राहत आहे .बीड, उस्मानाबाद, औरंगाबाद,लातूर जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात शेती आणि पिण्याच्या पाण्याचे नियोजन करणे आवश्यक आहे. दरवर्षी दुष्काळ निवारण्यासाठी कोट्याधीश रुपयांची तरतूद केली जाते पण ती तात्पुरती ठरते. कायमस्वरूपी मराठवाडातील दुष्काळ नाहीसा होण्यासाठी शासनासोबत सर्वांनीच पुढाकार घेऊन कार्य करणे गरजेचे आहे. तर भविष्यात उडवणाऱ्या भयंकर परिस्थिती उद्भवणार नाही.
**- प्रमोद कुलकर्णी, बीड**

**नैसर्गिक संकट गांभीर्याने घ्यावे लागणार...:**
पावसाने दडी मारल्याने यंदा भयावह परिस्थिती उद्भवलेली दिसत आहे. पिके कशीबशी जगली तर आता पावसाचा पत्ता नाही. वरूणराजा रुसलयाने खरिपासोबत रब्बीचे काहीच खरे दिसत नाही. शिवाय पाणीटंचाईची टांगती तलवार कायम राहण्याची चिन्हे आताच दिसत आहेत. या नैसर्गिक संकटावर कायम तोडगा काढण्याची वेळ आपल्यावर आली आहे. नाहीतर नुसताच गाजावाजा आपल्या मुळावर उठल्याशिवाय राहणार नाही. ही नैसर्गिक संकट गांभीर्यपूर्वक घेण्याची आणि त्यावर विचार करण्याची वेळ आता आपल्यावर आली आहे.
**- अमर चव्हाण, लातूर**



संकलन : बाळासाहेब जोगदंड औरंगाबाद

**पाणी वापराचे नियोजन करावे :**
एकीकडे देशातील उत्तरेकडे असणाऱ्या राज्यांमध्ये पाऊस धो- धो कोसळत असताना महाराष्ट्रावर त्याची वक्रदृष्टी कायम आहे. जून आणि जुलैचा पहिला आठवडा वगळला, तर त्याच महिन्याच्या अखेरपासून पावसाने मारलेली दडी ऑगस्ट अखेरपर्यंत कायम आहे. पावसाने राज्यातून काढता पाय घेतल्यामुळे शेतकऱ्यांपुढे मोठे संकट उभे राहिले आहे. एकिकडे शेतीचे नुकसान आणि दुसरीकडे कर्जाची टांगती तलवार अशाच परिस्थितीमध्ये हा शेतकरी अडकला आहे. काही दिवसांपूर्वीच हवामान विभागाने ऑगस्ट महिन्याच्या पहिल्या आठवड्यानंतरच पावसासाठी पूरक वातावरण निर्माण होईल, अशी शक्यता वर्तवली होती. त्यानंतर आता सात सप्टेंबरमध्ये पाऊस परतणार असे सांगितले आहे.
राज्यात सर्वत्र पावसाने ओढ दिली असून त्यांचे गांभीर्य ओळखून संभाव्य परिस्थितीसाठी उपाययोजना कराव्या लागतील. राज्यात सर्वत्र पावसाने ओढ दिली आहे. त्यामुळे आगामी काळात चांगला पाऊस व्हावा अशी अपेक्षा आहे. मात्र सरासरी पेक्षा कमी पाऊस झाला तर येणाऱ्या परिस्थितीला तोंड देण्यासाठी जिल्हा प्रशासनाने खबरदारीच्या उपाययोजनांना सुरूवात करावी. त्यामध्ये धरणातील पाणी साठा पाहून जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांच्या समन्वयातून काटकसरीने पाणी वापराचे नियोजन करावे. ग्रामीण भागात देखील विहिरी, तलावातील उपलब्धता पाहून पाण्याचे नियोजन करावे लागेल. देशाच्या अनेक भागात प्रचंड प्रमाणात वृक्षतोड होत आहे. त्यामुळे निसगार्चा समतोल ढासळत आहे. अनेक खेड्यातील माणसांना तर हंडाभर पाण्यासाठी वणवण भटकावे लागत आहे. जनावरांनाही पाणी पिण्यासाठी मिळत नाही. शेतातील पिकं करपून जात आहेत. ही विदारक भयानक परिस्थिती उघड्या डोळ्यांनी पाहवेनासी झाली आहे. माणसाने निसर्गावर कुठल्याही प्रकारची कुरघोडी न करता, वृक्षतोड न करता निसर्गाला साथ द्यायला हवी. **शाहीर माधव बैलकवाड, नायगाव, जि. नांदेड**

महाराष्ट्र Business Katta












# झंझावात : प्रा.बाबा हातेकर एका लढवय्याची कहाणी



प्रा. डॉ. सतीश मस्के
संपर्क क्र. : 9423397484

आधुनिक केसरी

**शिका! संघटित व्हा आणि संघर्ष करा या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचाराने अनेकजण भारावले. अनेक जणांनी शिक्षणाची कास धरली. शिकलेले तरुण संघटीत होऊ लागले आणि अन्याय,अत्याचाराच्या विरुद्ध संघर्ष करू लागले. शिक्षण घेऊन जो कोणी जिथे कुठे नोकरी करत असेल तिथेही हा आंबेडकरी विचार सांगू लागले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांची रुजवणूक सगळीकडे करू लागले. अगदी प्रामाणिकपणे तो विचार घराघरात पेरू लागले. हा विचार पेरणे किंवा रुजवणे जातीयवाद्यांच्या पुढे अवघड होते. आव्हान होते. आंबेडकरी विचाराने शिकलेला किंवा नोकरदार तरुण जातीयवाद्यांच्या डोळ्यात सतत सलत असे. तरीही त्याला न जुमानता आपल्या समाजावर, तरुणावर, नोकरदार माणसावर कोणी जातीय भावनेतून हल्ला केला, अन्याय अत्याचार केला तर त्याला उत्तर देणारे धाडस करणारे अभ्यासू लढवय्ये आंबेडकरी सैनिक, काही तरुण पुढे आले.**

जातीयवादयाबरोबर लढू लागले. अनेकांना न्याय मिळवून देऊ लागले. या अनेक आंबेडकरी लढवय्ये सैनिकापैकी आपल्या नोकरीची वेळप्रसंगी जिवाची,संसाराची पर्वा न करता प्रामाणिकपणे लढणारे लढवय्ये प्रा. बाबा हातेकर हे एक आहेत. प्रा.बाबा हातेकर हे एक शिस्तप्रिय आणि अभ्यासू व्यक्तिमत्व आहे. त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य समाजाला आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या विचार कार्याला समर्पित केले आहे. त्यांनी अनेकांचे आयुष्य घडवले आणि उभी केली आहेत. अनेकांच्या आयुष्याला कलाटणी दिली आहे. अनेकांच्या आयुष्यात ते अन्याय अत्याचाराच्या विरुद्ध लढण्यासाठी खंबीरपणे उभे राहिले आहेत. त्यांच्या जीवनात यावेळी अनेक प्रकारची वादळे आली. कुठल्याही वादळांना न डगमगता ती वादळे त्यांनी परतवून लावून आणि त्यांना न्याय मिळवून देऊन त्यांच्या पाठीशी पहाडासारखे उभे राहिले. ही त्यांची सारी जीवन कहाणी 'झंजावात'नावाच्या त्यांच्या अमृत महोत्सवी गौरव ग्रंथात समाविष्ट केली आहे. हा गौरव ग्रंथ डॉ. मिलिंद कसबे व डॉ. संजीव पगारे यांनी संपादित केला असून प्रा. डॉ. सुरेंद्र मोरे, प्रा. डॉ. दीपक शेजवळ, प्रा. डॉ. संजय ढोडरे, प्रा. बाळासाहेब गायकवाड, प्रा. डॉ. सतीश निकम,प्रा. डॉ. ललित संदानशिव आदी प्राध्यापक मंडळी या अमृतमहोत्सव गौरवग्रंथ संपादन समितीत आहेत.

हा गौरव ग्रंथ पुस्तकमार्केट पब्लिकेशन,पुणे ने प्रकाशित केला आहे. हा गौरवग्रंथ दोनशे चौतीस पानाचा असून मनातले बाबा, चळवळीतले बाबा, शिक्षणातले बाबा, विद्यार्थी घडविणारे बाबा व कुटुंबातले बाबा अशा पाच भागात विभागला आहे. प्रा. बाबा हातेकर हे व्यक्तिमत्वं अगदी विद्यार्थी दशेपासूनच आंबेडकरी चळवळीशी, रिपब्लिकन पक्षाशी जोडले गेलं. त्या कार्यात त्यांनी स्वतःला प्रचंड झोकून दिलं. उच्च शिक्षण घेतल्यानंतर ते प्राध्यापक म्हणून नोकरीला लागल्यानंतरही त्यांनी आपले कार्य सोडले नाही. त्यांच्या लढाऊ आक्रमक स्वभावामुळे, तत्वनिष्ठ आणि प्रामाणिक विचारामुळे वर्धा,अमरावती,गोंदिया अशा ठिकाणच्या नोकऱ्यांवर त्यांना पाणी सोडावे लागले.पुढे प्रा. बाबा हातेकर हे धुळे येथील विद्यावर्धिनी महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून रूजू झाले. त्यांनी प्राचार्य म्हणूनही प्रेरणादायी कार्य केले. हा सारा त्यांचा धगधगता जीवन प्रवास या 'झंजावात' रुपी गौरव ग्रंथात अनेक मान्यवर लेखक,साहित्यिक,विचारवंत व वेगवेगळ्या क्षेत्रातील मान्यवरांनी नोंदवला आहे. तो अनेकांना प्रेरणा, प्रोत्साहन आणि स्फूर्ती देऊन ऊर्जावान बनवणारा आहे.

प्रा. बाबा हातेकर हे खरे तर इतिहासाचे प्राध्यापक म्हणून १९७३ साली विद्यावर्धिनी महाविद्यालय, धुळे येथे रुजू झाले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात की, ज्याला इतिहास माहित नाही तो इतिहास घडवू शकत नाही. अगदी त्याचप्रमाणे प्रा. बाबा हातेकर यांनी इथल्या वर्णव्यवस्थेचा,जाती व्यवस्थेचा, धर्म व्यवस्थेचा आणि भारतीय संविधानाचाही अभ्यास करून, विविध प्रकारच्या चळवळी, संघटना निर्माण करून अनेकांना न्याय मिळवून देण्याचा नवा इतिहास घडवला आहे. हे वास्तव कुणीही नाकारू शकत नाही. म्हणूनच त्यांच्या या गौरव ग्रंथात ज्येष्ठ इतिहास तज्ज्ञ डॉ. जयसिंगराव पवार, विद्यावर्धिनी सभा व महाविद्यालय धुळ्याचे संस्थापक अध्यक्ष व माजी आमदार प्रा.पी.डी.दलाल, विशेष पोलीस महानिरीक्षक मा.शं. महेशगौरी, आय एम एस माझी प्रधान सचिव,चेन्नई विश्वनाथ शेगावकर, प्राचार्य तानसेन जगताप, पत्रकार गो.पी.लांडगे, पत्रकार बापू ठाकूर, प्रा. जयप्रकाश म्हात्रे, आंबेडकरी चळवळीचे जेष्ठ सैनिक सुरेश लोंढे, ॲड.डी. एन.पिसोळकर, डॉ.संजीव पगारे, आम्रपाल बनसोड, प्राचार्य डॉ. देवेंद्र विसपुते, प्राचार्य डॉ. दीपक भामरे, प्राचार्य डॉ. विठ्ठलराव घारपुरे,प्रा. पी.जी. रामटेके, डॉ. राजेंद्र चिकटे, प्रा. डॉ. आर.एम.बागुल, डॉ. सरब्जित चीमा, प्रोफेसर खलील अन्सारी, डॉ.सी.एन.भानुदास, डॉ. वैशाली सोनवणे,कवी जगदीश देवपूरकर, शांतीलाल भामरे, डॉ. विनोद रंगारी,भीमराव गरुड, अनिल बागुल, बन्सीलाल पगारे, रवींद्र पाटील, साहेबराव गरुड,प्रा. श्रीपाद नांदेडकर , शेखर विसपुते, डॉ. संजय ढोडरे, भास्कर पानपाटील, प्रा. बाळू गायकवाड, प्रा. अर्चना मनोहर हातेकर, लक्ष्मी मेढे, हेमलता माणके, साक्षी हातेकर, प्रा. प्रमोद हातेकर, आनंद सैंदाणे, रवींद्र शिंदे अशा अनेक विविध जातीधर्मातील माननीय व्यक्तींनी प्रा. बाबा हातेकर यांच्या विचार, कार्यावर प्रेम करणाऱ्यांनी त्यांच्या कार्यकर्तुत्वाचा आलेख यामध्ये मांडला आहे. विविध जाती




धर्मातील लोकांवर झालेल्या अन्याय बाबत प्रा. बाबा हातेकर चळवळीच्या माध्यमातून, संघटनेच्या माध्यमातून, भारतीय संविधानाच्या माध्यमातून ते त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहून त्यांनी त्यांना न्याय मिळवून दिलेला दिसतो म्हणूनच त्यांनी या ग्रंथात आपली मनोगते मांडली आहेत. ज्यांच्याशी प्रा. बाबा हातेकरांचा संपर्क आला त्यांनीही त्यांच्या विचाराबाबत, कार्याबाबत, निष्ठेबाबत, स्वभावाबाबत, घडवण्याबाबत, सहकार्याबाबत आपापली मते नोंदवली आहेत.

सदिच्छा म्हणून प्रा. बाबा हातेकरांबद्दल लिहिताना डॉ. जयसिंगराव पवार म्हणतात की,' बाबांशी दोन-तीन दिवसांत जी चर्चा झाली, त्यातून एक गोष्ट प्रकर्षानं मला जाणवली. ती म्हणजे बाबांच्या डोक्यात फुले -शाहू- आंबेडकरांच्या विचारांची विण घट्ट होऊन बसली आहे. या विचारधारेमुळेच ते समाजातील अन्यायाविरुद्ध दंड थोपटून अनेकदा उभे राहिल्याचे दिसते. अन्यायाबद्दलची चीड व त्यास विरोध करण्याचे धाडस या विचारधारेनेच त्यांना दिले. त्यातही डॉ.आंबेडकरांच्या'शिका, संघटित व्हा व संघर्ष करा या क्रांतिकारी तत्त्वाचा त्यांच्यावर मोठा प्रभाव पडला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा हा नव्या युगाचा मूलमंत्र त्यांनी आपल्या कृतीशील जीवनात सतत समोर ठेवून वाटचाल केल्याचे दिसून येते. या गौरव ग्रंथातील अनेक लेख त्यांच्या या वाटचालीची साक्ष देताहेत.'यावरूनही आपल्याला त्यांच्या कार्याची महती लक्षात यायला लागते.

प्रा. बाबा हातेकर यांनी कॉलेज जीवनाशी असणारे, विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती संदर्भातील, वसतीग्रहासंदर्भातील, प्राध्यापकांच्या अडचणीच्या संदर्भातील प्रश्न त्यांनी जिकरीने,न्यायाने कधी आंदोलने करून सोडविली आहेत. पुणे विद्यापीठ,पुणे व उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव या विद्यापीठातही अनेक विविध समित्यावर काम करून, प्राध्यापकांचे संघटन बांधून विविध गोष्टींना न्याय मिळवून देण्याचे महत्वपूर्ण काम त्यांनी केले आहे. यासंबंधीची मांडणी अनेक मान्यवरांनी लेखात केली आहे. याविषयी डॉ. राजेंद्र चिकटे म्हणतात की,'उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या स्थापनेपर्यंत हातेकर सर पुणे विद्यापीठाच्या सिनेट व स्थायी समितीचे सदस्य, विद्यापीठाच्या सोशल सायन्सेस विद्यार्थ्यांचे सदस्य, अधिष्ठाता (डीन) आणि अकॅडमी कौन्सिलचे सदस्य होते. आधी सभा असो वा विद्या परिषद प्राध्यापक बाबा हातेकर सर्वत्र प्रभावीच ठरत होते. विरोधकांनाही सभागृहातील त्यांची भाषणे श्रवणीय वाटत असत.'त्याचबरोबर या पुस्तकाची पाठराखंड करताना ज्येष्ठ विचारवंत डॉ. रावसाहेब कसबे याबाबत लिहितात की,'पुणे विद्यापीठाचे सामाजिक शास्त्राचे डीन म्हणून जे काम बाबाने केले ते अमूल्य आहे. पुणे आणि जळगाव विद्यापीठाच्या विविध विभागात ज्या व्यासंगी प्राध्यापकांची निवड झाली त्याला बाबांची दूरदृष्टी कारणीभूत आहे. त्यांच्यामुळे या विद्यापीठाची शैक्षणिक गुणवत्ता वाढली.' खरे तर अशा या मान्यवरांच्या प्रतिक्रियेमुळे त्यांच्या कार्याची महती किती दूरदृष्टीची होती, सामाजिक समतेची होती हे लक्षात यायला लागते. अशा या आंबेडकरी चळवळीतील लढवय्ये कार्यकर्त्यांचा, विचारवंताचा जाज्वल्य इतिहास'झंझावात'या गौरव ग्रंथातून बाहेर आला आहे. हा इतिहास नेहमीच इथून पुढेही आंबेडकरी चळवळीत कार्य करणाऱ्या कार्यकर्त्याला, शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्याला, नोकरी करणाऱ्यांना प्रेरणा देणारा आहे आणि जातीयवाद्यांच्या उरात धडकी भरवणारा आहे. त्यामुळे हा ग्रंथ आंबेडकरी चळवळीला ऊर्जा देणारा आहे. म्हणून प्रत्येकाने वाचायला हवा.

झंझावातः डॉ. मिलिंद कसबे, डॉ. संजीव पगारे
पुस्तकमार्केट पब्लिकेशन, पुणे
मुखपृष्ठः ग्राफिक्स पुणे, आतील मांडणी बुद्धभूषण साळवे
पृष्ठे २३४, किंमत रू. ४००

# आज कोणीही राखीची वाट पाहात नाहीत ?



अंकुश शिंगाडे, नागपूर
संपर्क क्र. : ९३७३३५९४५०

आधुनिक केसरी

**आज राखीचा सण पाहिला आणि त्याचा विचार केला तर असं जाणवतं की हा राखीचा सणच यायला नको. कारण आजच्या काळात राखीच्या नावावर बहिण भावाकडून मोठमोठ्या अपेक्षा करते. त्या अपेक्षा राखीचा एक धागा बांधून पुर्णही करुन घेते. परंतु भावावर संकट आल्यास त्याला मात्र ती मदत करीत नाही. त्याला नक्कीच वाऱ्यावर सोडते. पुर्वीच्या काळात असं नव्हतं. बहिण भावाला राखी बांधायची. त्यांच्याकडून अपेक्षा करायची. त्या अपेक्षा पुर्ण करुन घ्यायची नव्हे तर भावाला मदतही करायची त्याच्या संकटसमयी. याबाबत उदाहरण महाभारताचं नक्कीच देता येईल. महाभारतात द्रोपदीनं क्लिष्णाला मदत केली होती.**

क्रिष्णाच्या करंगळीतून एकदा सुदर्शनामुळं रक्त निघताच त्या करंगळीला बांधण्यासाठी तिनं आपलं नवं कोरं वस्त्र फाडलं होतं असं मानलं जातं. त्यानंतर क्रिष्णानंही तिला वस्त्रहरणाचे वेळेस वस्त्र पुरवून तिची अब्रू वाचवली होती.

राखी........बहिण भावाला बांधत असते. कशासाठी तर त्या भावानं आपल्या बहिणीनं रक्षण करावं. तिचा मानसन्मान जोपासावा. लहान असेल तर तिला न्हाऊ पिवू घालावं. तिचे दुःख दूर करावे नव्हेतर ते दुःख दूर करण्याचा प्रयत्न करावा. शपथा घ्याव्या की मी माझ्या बहिणीला मुळीच त्रास होवू देणार नाही. राखी सण जेव्हा येतो. तेव्हा भावाला बहिण राखी बांधते. बदल्यात भाऊही तिला भरभरुन प्रेम देतो. काही वस्तूही देतो नव्हे तर रक्षणही करतो. स्वराज्य टिकवीत असतांना एकदा सम्राट अकबराला चितोडकडून राखी बांधलेली आहे.

रक्षाबंधन हा सण आनंदाचा, उत्साहाचा. दूर असलेल्या भावाला राखी पाठवायची बहिणीची घाई आधीपासूनच सुरु होते. त्या दिवशी जेवणात काय पदार्थ असणार हे सगळ्यांनाच ठाऊक असतं. साखरभात नाही तर करंज्या किंवा वडे पापडं असेच काही असणार. हे आधीच माहीत होतं. संरक्षण करणे, संरक्षण देणे हे केवढं मोठं काम आहे. आज राखीचा सण. आपण तो का आणि कशासाठी साजरा करतो? असं जर कोणाला विचारल्यास कोणीही सांगेल की आज राखीपौर्णिमा आहे. आज बहीण तिच्या भावाला राखी बांधते. राखी हे बहीण- भावाच्या प्रेमाचं प्रतीक आहे. बस एवढंच? आणखी काय महत्त्व आहे या सणाचं? तर राखी म्हणजे रक्षा, बहिणीचं रक्षण करण्याचं बंधन. कोणाला भाऊ नसेल किंवा एखाद्याला बहीण नसेल तर मग मानलेल्या भावालाही राखी बांधली जाते. आम्ही वर्गबांधवांनाही राख्या बांधतो. राखी म्हणजे संस्कार. काही वेळेस आपली परंपरा, संस्कृती, इतिहास जर कोणाला समजली तर त्यांच्या ज्ञानात भर पडते. राखी स्त्रीने पुरुषाला बांधायची. म्हणजे त्या स्त्रीचं रक्षण करण्याची जबाबदारी त्या पुरुषानं स्वीकारायची. स्त्रिला संपूर्ण संरक्षण देणं त्या पुरुषाचं कर्तव्य ठरतं. पुराण कथेनुसार सगळ्यात पहिली राखी इंद्राणी म्हणजेच इंद्राच्या राणीनं आपला पती इंद्र याला बांधली. देव-देवतांच्या संग्रामात देवांचा पराजय झाला तर मोठं संकट ओढवेल म्हणून त्यापासून संरक्षण मागण्यासाठी राखी बांधली गेली असं म्हणतात. कालांतरानं श्रीकृष्णानं युधिष्ठिराला रक्षाबंधनाचे महत्त्व सांगितले. इतिहासात तशी नोंदच आहे. तशी आणखी एक




इतिहासात अशी नोंद आहे की मुगल साम्राज्यात हिंदू स्त्रियांवरचे अत्याचार थांबविण्यासाठी, रक्षण मिळविण्यासाठी राजपूत स्त्रियांनी अकबर बादशाहला राखी बांधली. बादशाहानेही त्याचाच मान करुन स्त्रियांवरचे अत्याचार बंद केले. आताही स्त्रिया सीमेवर तैनात असलेल्या जवानांना राखीपौर्णीमेला आवर्जून राख्या पाठवतात.

रक्षणाचे बंधन म्हणजे राखी. राखी म्हणजे केवळ रंगीत दो-यात मणी ओवून मनगटावर बांधून मिरवण्यासाठी काही तो दागिना नाही. त्याचं विशेष महत्व आहे. तसं स्थानही. तसं पाहता राखी म्हणजे एक सुशोभन करुन तयार केलेला धागा नाही तर तो एक साधा धागाही असू शकतो. तसंच तो राखीचा धागा बांधणं म्हणजे संरक्षण करुन घेणं नाही. त्या राखीच्या बंधनाच्या मागं काही वेगळ्या प्रकारच्या अलौकिक अशा भावना असतात. त्या भावना पाहिल्या तर कुणालाही गहिवरुन आल्याशिवाय राहात नाही. राखी बांधणं वा बांधून घेणं हा संस्कारच. ज्यांना राखीचा हा धागा बांधला जातो. तो व्यक्ती काही का असेना, आपल्या हस्ते राखी बांधणा-या आपल्या बहिणीचं संरक्षण करीत असतो. ज्याला ही राखी बांधली जाते. त्या व्यक्तीच्या मनात ती राखी जी बांधते, त्या स्त्रीबाबत काहीही उणंदुणं असल्यास ते उणंदुणं ती व्यक्ती विसरुन जाते व तिचं संरक्षण करण्याचा विचार करते.

राखी हे पवित्र बंधन असून या राखीनं मोठमोठी युद्धही थांबलेली आहेत नव्हे तर थांबवली गेली आहेत. पुर्वी याच राखीच्या धाग्याला मोठा सन्मान दिला जाई. राखी बांधणा-या आपल्या बहिणीला ओवाळणी म्हणून भाऊ तिचे केवळ संरक्षणच करीत नव्हता तर तिच्यासाठी जीवही देत होता. म्हणतात की सुदामा जेव्हा क्रिष्णाला भेटायला व मदत मागायला गेला. तेव्हा द्वारकेमध्ये राखीचा उत्सव झाला होता व सुदामाला सर्व श्रीकृष्ण दरबारातील स्रियांनी राख्या बांधल्या होत्या.

महत्वाचं सांगायचं म्हणजे राखीचा हा पवित्र धागा. त्याला पवित्र महत्व प्राप्त झालं. ते त्या धाग्यानं केलेलं अलौकिक कार्य. पुर्वीच्या काळात त्या धाग्यानं असे असे कार्य केले की जे कार्य आश्चर्यचकीत करणारं वाटतं. तसं पाहिलं तर पुर्वी स्वार्थ नव्हता. आजचा काळ वेगळा आहे. आजच्या काळामध्ये फक्त बहिणी, ही राखी बांधून भावाकडून फायदा करुन घेतात. परंतु जेव्हा भावाला बहिणीची आवश्यकता असते, तेव्हा मात्र नाक मुरडतात. याचाच अर्थ त्या अशा संकटात सापडलेल्या आपल्या भावांना मदत करीत नसल्याचं दिसते. यात विशेष सांगायचं म्हणजे राखीचा हा धागा केवळ बहिणीलाच भावानं मदत करण्यासाठीच नसावा तर बहिणीनंही भावाला मदत करण्यासाठी असावा. तसंच राखीचा हा धागा रेशमाचाच असावा असा नाही. तो साधाही असला तरी चालावा. परंतु प्रत्येक बहिणीनं तो काळजीपोटी बांधावा. तो धागा बांधतांना एक शपथ घ्यावी की जशी मी माझ्या भावाकडून मला त्यानं मदत करावी अशी अपेक्षा करते. तशी मिही त्याची मदत करीन. भावानं बहिणीच्या या पवित्र धाग्याची लाज राखावी. तिला मदत करावी. तसंच बहिणीनंही वेळप्रसंगी आपल्या भावाची मदत करावी. जेणेकरुन प्रत्येक भावाला आपल्या बहिणीबद्दल हेवा वाटेल. तसाच तो आवर्जून राखी सण येण्याची सतत वाट पाहात राहील. हे तेवढंच खरं आहे. यात आतिशयोक्ती नाही.

# बोर्डाच्या परीक्षा



डॉ. विजय पांढरीपांडे
मो. 7659084555


आधुनिक केसरी

**बोर्डाच्या परीक्षा आता पर्यंत वार्षिक होत असत.आता वर्षातून दोनदा परीक्षा घेणार आहेत. थोडक्यात तिथेही सेमीस्टर पध्दत येणार. विद्यार्थ्यांच्या दृष्टीने हे सोयीचे असणार.खरे तर सातत्याने होणारे मुल्य मापन अधिक चांगले.सारे काही तीन तासाच्या शेवटच्या वार्षिक परीक्षे वर अवलंबून, म्हणजे एक प्रकारे मुलाचा मानसिक ताण वाढवणे. कारण त्या तीन तासात काही गडबड झाली तर त्याचे परिणाम आपल्या कडे दूरगामी असतात. बोर्डाची म्हणजे दहावी,बारावीची परीक्षा विद्यार्थ्यासाठीच नव्हे तर पालका साठी डोके दुखी होऊन बसली आहे. एव्हढे करूनही या परीक्षा मुळे इप्सित साध्य होते का? मुळीच नाही! या परीक्षामध्ये होणारी गुणाची उधळण हास्यास्पद ठरते आहे. मिळालेले गुण, अन् मुलाची बुध्दी, क्षमता, विद्वत्ता, याचा अर्थाअर्थी काही संबंध नसतो. कमी गुण मिळालेला विद्यार्थी इतर बाबतीत हुशार असू शकतो.**

पुढील प्रवेशासाठी या गुणावर अवलंबून न राहता वेगवेगळ्या कोर्सेस साठी पुनः परीक्षा घेतल्या जातात. प्रत्येक राज्याचे बोर्ड, त्यांचे अभ्यासक्रम, काठिण्य पातळी, परीक्षेचे मुल्य मापनाचे निकश सारेच भिन्न असते. देश पातळीवर राष्ट्रीय संस्थात प्रवेश देणारे ,राज्य बोर्डाच्या निकालावर विश्वास ठेवत नाहीत! शिक्षणाच्या बाबतीत, मुल्य मापनाच्या बाबतीत राष्ट्रीय स्तरावर एक वाक्यता नाही आपल्या कडे! नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाकडे अनेक ( वेगळ्या पक्षाच्या ) राज्य सरकारांनी पाठ फिरवली आहे!

मुळात परीक्षेचा उद्देश काय,तपासायचे काय,कसे हे मुळात समजून घेतले पाहिजे.आजकालच्या परीक्षा पद्धतीत वेगळा विचार करण्याची तार्किक क्षमता, एकाच समस्येकडे वेग वेगळ्या अंगाने, भूमिकेतून बघण्याचे कौशल्य तपासले जात नाही.ठोकळ्या सारखे प्रश्न,त्याची ठराविक उत्तरे, ठराविक वेळात ठराविक गुण मिळवण्या साठी द्यायची! ही आपली पद्धत! आता तर दिलेल्या परिछेदावरच प्रश्न असतात! म्हणजे उत्तरही पेपरात दिलेले!

अनेक मुलांना भाषेचे आकलन नसते.उत्तर कसे लिहायचे, मुद्दे कसे पायरी पायरीने मांडायचे हेही शिकवले जात नाही. टेक्स्ट बुकचा वापर कमी. गाईडचा वापर जास्त. वर्गात उपस्थिती कमी. शिकवणी वर्गात मात्र गर्दी. या पध्दतीने मुलांना स्वतःच्या पायावर स्वतंत्र उभे राहण्या ऐवजी पांगळे केले आहे. आज तुम्ही कुठल्याही सत्तरीत ल्या व्यक्तीला विचारा, ते म्हणतील आधीचेच शिक्षण किती तरी चांगले होते. दर्जेदार होते. काळा नुसार बदल व्हायलाच हवेत. अभ्यासक्रम बदलायला हवेत. नव्हे तंत्रज्ञान वापरायला हवे. पण जे चांगले होते ते का सोडायचे? परदेशात मी पाहिले, वार्षिक परीक्षा नावाचा प्रकार नाही. मुलांचे सातत्याने मुल्य मापन केले जाते.विषयाचे आकलन तर तपासतातच. पण तुमचे बोलणे, वागणे, ग्रुप ॲक्टिविटी, भाषेवरील प्रभुत्व, समस्येकडे बघण्याचा दृष्टिकोन, परिस्थिती हाताळण्याचे कौशल्य सारे वैज्ञानिक, गणिती पद्धतीने तपासले जाते.तुमचा कल कोणत्या क्षेत्राकडे आहे हे शिक्षक ठरवितात.पालक नाही. आपल्याकडे वाढलेले कॉपी पेस्ट चे प्रमाण, शिकवणी क्लासेसचे वाढलेले प्रस्थ यामुळे आधीच विद्यार्थ्यांचे प्रचंड नुकसान झाले आहे, होते आहे. परीक्षेतील गैर प्रकार किती तरी पटीने वाढले आहेत. यात पालक, शिक्षक सारेच सामील आहेत.मग आपण परीक्षेची गुणवत्ता कोणत्या निकशावर तपासायची? राज्यात, देश पातळीवर किती तरी वेग वेगळे बोर्ड आहेत. त्यांचे शिकवणे वेगळे, अभ्यासक्रम वेगळे,



परीक्षेचा, मुल्य मापनाचा दर्जा वेगळा. त्यामुळे एकाला दुसऱ्या पेक्षा वरचढ ठरवायचे कसे हा प्रश्न उरतोच. प्रश्न पत्रिका तयार करणे हे देखील कौशल्य आहे. पण जसे वर्गात शिकवणे म्हणजे पाट्या टाकणे ही मनोवृत्ती झालीय, तसेच प्रश्न पत्रिका तयार करणे गांभीर्याने घेतले जात नाही.पेपर सोडविताना सामान्य मुलाला कठीण वाटायला नको, अन् हुशार विद्यार्थ्याला देखील आव्हान वाटायला हवे.तपासताना, ABSOLUTE MARKING न करता रीलेटिव ग्रेडिंग करायला हवे. यासाठी शास्त्र शुध्द सांख्यिकी पद्धती उपलब्ध आहेत.यामुळे कोणावर अन्याय होणार नाही. गुणाची उधळण होणार नाही.८० टक्के मिळविणारा ७० टक्के मिळविणाऱ्या पेक्षा वरचढ असतोच असे नाही.स्पर्धा वाढल्याने या सर्व समस्या निर्माण झाल्या आहेत. गुणाच्या टक्केवारी ला पुढे फारसे महत्व नसते, हे विद्यार्थ्यांना, पालकांना, शिक्षकांना कळेल तो सुदिन! गुणांना अवास्तव महत्व दिले गेल्याने परीक्षेतील गैर प्रकार वाढले आहेत.

प्रश्न बोर्डाच्या परीक्षा एकदा घ्यायच्या की दोनदा हा नाहीच. उचित मुल्य मापन हा खरा प्रश्न आहे. आकलन क्षमता योग्य शास्त्रीय पद्धतीने तपासायची कशी हा कळीचा मुद्दा आहे.तुलनेत खाजगी शाळात सातत्याने मुल्य मापन केले जाते.सरकारी शाळेतील स्थिती सगळी कडे आनंदी आनंद अशी असते. काही मोजके अपवाद, प्रामाणिक प्रयोगशील शिक्षक आहेत. पण अपवादात्मक. अनेक शाळात मूलभूत सुविधा नाहीत. नियमित शिक्षक, प्रयोग शाळा, टॉयलेट्स नाहीत.या बातम्या आपण टी वी वर बघतोच. मुळात शिक्षण हा सरकार साठी दुय्यम विषय असतो. सरकारच्या प्राथमिकता वेगळ्या निकषावर अवलंबून असतात. त्यामुळे अधून-मधून नवे शैक्षणिक धोरण, त्यावर कार्यशाळा,बोर्डाच्या एका ऐवजी दोनदा परीक्षा असे दाखवी नाटकी प्रयोग केले की आपले कर्तव्य संपले असे सरकारला, अधिकाऱ्यांना वाटते. आपल्यालाही आता अशा राजकीय नाटकाची सवय झाली आहे! कारण नाटकाच्या पडद्याच्या दोऱ्या आपल्या हातात नाहीत!

# राजकीय पक्षांमध्ये लोकशाही किती महत्त्वाची ?



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

आधुनिक केसरी

**काही महिन्यांपूर्वी काँग्रेसमधील कलह चव्हाट्यावर आला होता. काँग्रेसमध्ये पक्ष नेतृत्वावर प्रश्न उपस्थित करण्यात आला होता. पक्ष नेतृत्वावर अनेकांनी आक्षेप घेत काँग्रेस पक्षातील अनेक वरिष्ठ नेत्यांनी कागद पक्षाला रामराम केला. कारण पक्षांतर्गत लोकशाहीचा अभाव, पारदर्शकतेचा अभाव, आणि घराणेशाही यावर अनेक ज्येष्ठ नेत्यांनी प्रश्न उपस्थित करत काँग्रेस पक्ष सोडला. यानंतर राष्ट्रीय स्तरावरही पक्षाच्या नेतृत्वाविरोधात आवाज उठवण्यात आला महाराष्ट्राच्या राजकारणात देखील शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या पक्षांतर्गत लोकशाहीवर प्रश्न उपस्थित झाला. या पक्षातील ज्येष्ठ कार्यकर्त्यांनी व नेत्यांनी पक्ष नेतृत्वाला आव्हान दिले.**

व वेगळा गट स्थापन केला व सरकारमध्ये स्थापन झाली शिवसेनेतून शिंदे गटाची शिवसेना राष्ट्रवादीतून अजित पवार बाहेर पडले.. या घटनांमुळे देशातील राजकीय पक्षांमधील लोकशाही व्यवस्थेचे महत्त्व पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे. भारत हा जगातील अशा काही देशांपैकी एक आहे जिथे बहुपक्षीय लोकशाही व्यवस्था फोफावत आहे. गेल्या सात दशकांमध्ये भारतातील बहुपक्षीय लोकशाही व्यवस्थेला अनेक चढउतार आणि आव्हानांचा सामना करावा लागला असेल, परंतु आपल्या देशातील लोकशाही अतिशय मजबूत स्थितीत आहे. आणि इतर कोणत्याही देशाच्या लोकशाही व्यवस्थेप्रमाणेच, भारतातील लोकशाही प्रक्रिया पुढे नेण्यात, लोकशाही राजकारणाच्या मुळांवर पाणी घालण्यात आणि सरकारची सत्ता चालवण्यात राजकीय पक्षांनीही महत्त्वाची भूमिका बजावली आहे. पण, गंमत अशी आहे की, देशातील राजकीय पक्ष कोणत्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार चालवावेत, याचा भारतीय राज्यघटनेत उल्लेख नाही. आणि, त्यांचे नियमन कसे करावे. उलट आपल्या राज्यघटनेत राजकीय पक्षांचा उल्लेख नाही हे सत्य आहे. केवळ १९५१ च्या लोकप्रतिनिधी कायद्याच्या कलम २९ (A) मध्ये असे म्हटले आहे की राजकीय पक्षांची नोंदणी करावी. भारतीय निवडणूक आयोगालाही राजकीय पक्षांच्या कारभारात कोणतीही भूमिका बजावण्याचा अधिकार नाही.

२००२मध्ये इंडियन नॅशनल काँग्रेस विरुद्ध इन्स्टिट्यूट ऑफ सोशल वेलफेअर अँड अदर्स या खटल्यात सर्वोच्च न्यायालयाने निर्णय दिला की भारतीय निवडणूक आयोग कोणत्याही नोंदणीकृत राजकीय पक्षाविरुद्ध सक्तीची कारवाई किंवा दंडात्मक कारवाई करू शकत नाही कारण एखाद्या राजकीय पक्षाने तत्त्वांचे उल्लंघन केले आहे. पक्षाची अंतर्गत लोकशाही. राजकीय पक्षांची नोंदणी रद्द करण्याचा निवडणूक आयोगाचा अधिकार सर्वोच्च न्यायालयाने मान्य केला होता. परंतु, न्यायालयाने असेही म्हटले होते की राजकीय पक्षांची नोंदणी इतर कोणत्याही प्रकारच्या नोंदणीपेक्षा पूर्णपणे वेगळी आहे. त्यामुळे राजकीय पक्ष आणि त्यांच्या अंतर्गत संघटनांच्या कामकाजात लोकशाही प्रक्रियेचे पालन करणे जवळजवळ अशक्य आहे. आणि या कारणास्तव राजकीय पक्षांकडून लोकशाही वर्तनाची अपेक्षा करणे कठीण होते.

२००२ मध्ये इंडियन नॅशनल काँग्रेस विरुद्ध इन्स्टिट्यूट ऑफ सोशल वेलफेअर अँड अदर्स या खटल्यात सर्वोच्च न्यायालयाने निर्णय दिला की भारतीय निवडणूक आयोग कोणत्याही नोंदणीकृत राजकीय पक्षाविरुद्ध सक्तीची कारवाई किंवा दंडात्मक कारवाई करू शकत नाही कारण राजकीय पक्ष अंतर्गत लोकशाहीची तत्त्वे आहेत. पक्षाचे उल्लंघन झाले आहे.

**प्रमुख आव्हाने कोणती आहेत ?**

कारण, राजकीय पक्ष हे भारतीय लोकशाहीचे प्रमुख पात्र आहेत. अशा स्थितीत भारतातील लोकशाहीची ताकद आणि उन्नती मुळात राजकीय पक्षांच्या अंतर्गत लोकशाही वर्तनावर अवलंबून असते. परंतु, राजकीय पक्षांमध्ये लोकशाही प्रक्रियेचा अभाव आहे. याची दोन मुख्य कारणे आहेत. पहिली गोष्ट म्हणजे पक्षांतर्गत नेतृत्व ठरवण्याची प्रक्रिया पारदर्शक किंवा सर्वसमावेशक नाही. यामुळे भारतातील सर्व नागरिकांच्या समान राजकीय संधी मिळण्याच्या अधिकारांचे उल्लंघन होते. पक्षांमध्ये अंतर्गत लोकशाही नसल्यामुळे सर्व नागरिकांना राजकारणात भाग घेण्याची आणि निवडणूक लढवण्याची समान संधी मिळत नाही.

दुसरे कारण म्हणजे राजकीय पक्ष केंद्रीकृत व्यवस्थेखाली चालवले जातात. १९८५ च्या पक्षांतर विरोधी विधेयकातील कठोर तरतुदींमुळे, कोणत्याही राजकीय पक्षाचे आमदार किंवा खासदार त्यांच्या वैयक्तिक निवडीनुसार राज्य विधानसभा किंवा संसदेत मतदान करू शकत नाहीत. पक्षांतर विरोधी कायद्यानुसार, सर्व लोकप्रतिनिधींना राज्य विधानसभा आणि संसदेत मतदान करताना त्यांच्या पक्षाच्या व्हिपचे पालन करणे बंधनकारक आहे. पक्षाच्या व्हिपनुसार त्या आमदार किंवा खासदारांनी मतदान न केल्यास त्यांचे सदस्यत्वही रद्द होऊ शकते. राजकीय पक्षांतर्गत केंद्रीकृत आणि अस्पष्ट राजकीय व्यवस्थेचा परिणाम म्हणजे निवडणूक लढवण्यासाठी पक्षाच्या तिकीटांचे वाटप लोकसंख्येच्या एका विशिष्ट वर्गालाच दिले जाते, हे विविध संशोधनांतून समोर आले आहे. आणि समाजातील उर्वरित घटकही निवडणुकीसाठी पक्षाचे तिकीट मिळण्यापासून वंचित आहेत.

बहुतांश राजकीय पक्षांमध्ये, पक्षांतर्गत संघटनात्मक पदांच्या निवडणुकीत भाग घेणे हे मोठे आव्हान असते. पक्षाचा नेता कोण असेल, याचा निर्णय पक्ष संघटनेशी निगडित मोजकेच लोक घेतात, असे दिसून आले आहे. आणि पक्षाच्या संघटनेवर या लोकांची मजबूत पकड आहे. कोणत्याही राजकीय पक्षांतर्गत राष्ट्रीय पातळीवर कधी निवडणुका झाल्या. ज्यामध्ये राष्ट्रीय संघटना किंवा निर्णय घेणारी कार्यकारिणी किंवा कार्यकारिणी निर्णय घेते. तरीही पक्षातील काही बडे नेतेच पुढे सरसावतात. ते त्यांच्या प्रभावाचा वापर करतात आणि त्यांच्या स्वतःच्या किंवा त्यांच्या निवडलेल्यांच्या नावाचा प्रचार करण्यासाठी संस्थेला धरून ठेवतात. त्यानंतर त्या नावांवर औपचारिक शिक्कामोर्तब केले जाते. बहुतांशी असे घडते की पक्षाच्या नेतृत्वाबाबत इतर कोणीही निवडणुकीत भाग घेत नाही. आणि बहुतांश पक्षांमध्ये पक्षाचा अध्यक्ष कोण होणार, हे सर्वानुमते ठरवले जाते. राजकीय पक्षांमध्ये संघटना निवडणुकीच्या नावाखाली काही निवडक नेतेच पुढे येत असल्याचे अनेकवेळा दिसून आले आहे. आणि बाकीचे लोक फक्त आपल्या नावावर शिक्का मारण्याची औपचारिकता पूर्ण करतात. आणि पक्ष संघटनेच्या या निवडणुकाही नियमित होत नाहीत. अनेकदा पक्षांतर्गत निवडणुकांसाठी निश्चित कालमर्यादा नसते. जेव्हा सोय असते किंवा मन असते तेव्हा निवडणुका होतात. किंवा ते बराच काळ टाळले जातात. भारतातील 'राजकीय व्यवस्थेच्या वाढत्या गुन्हेगारीकरणा'बाबत सर्वोच्च न्यायालयाने चिंता व्यक्त केली होती. आता देशात राजकीय पक्षांवर नियंत्रण ठेवण्यासाठी कोणतीही कायदेशीर आणि बंधनकारक व्यवस्था नाही. त्यामुळे राजकीय पक्षांमध्ये लोकशाही प्रक्रियेचा मोठा अभाव आहे.

भारतातील राजकीय पक्षांतर्गत काही मोठ्या नेत्यांकडून गुंडगिरी करणे हे आपल्या राजकीय व्यवस्थेसमोरील मोठे आव्हान आहे. राजकीय पक्षांतर्गत केंद्रीकृत आणि अस्पष्ट राजकीय व्यवस्थेचा परिणाम म्हणजे निवडणूक लढवण्यासाठी पक्षाच्या तिकीटांचे वाटप लोकसंख्येच्या एका विशिष्ट वर्गालाच दिले जाते, हे विविध संशोधनांतून समोर आले आहे. आणि समाजातील उर्वरित घटकही निवडणुकीसाठी पक्षाचे तिकीट मिळण्यापासून वंचित आहेत.

काही वृत्तानुसार एका राजकीय पक्षाचे काही नेते, ज्यांचा समाजात प्रभाव आहे. ज्यांच्याकडे पैशांची कमतरता नाही, अशा लोकांनाच निवडणुकीसाठी पक्षाच्या तिकीट वाटपात प्राधान्य दिले जाते. अलीकडच्या काळात आपण पाहिले आहे की, गुन्हेगारी प्रतिमा आणि पार्श्वभूमी असलेल्या अनेकांना राजकीय पक्ष त्यांच्या वतीने निवडणूक लढवण्यासाठी तिकीटही देतात. भारतातील 'राजकीय व्यवस्थेच्या वाढत्या गुन्हेगारीकरणा'बाबत सर्वोच्च न्यायालयाने चिंता व्यक्त केली होती. आता देशात राजकीय पक्षांवर नियंत्रण ठेवण्यासाठी कोणतीही कायदेशीर आणि बंधनकारक व्यवस्था नाही. त्यामुळे राजकीय पक्षांमध्ये लोकशाही प्रक्रियेचा मोठा



अभाव आहे. याचाच परिणाम म्हणजे आपल्या देशाच्या लोकसंख्येच्या मोठ्या भागाला राजकीय पक्षांचे नेतृत्व करण्याची आणि निवडणूक लढवण्याची तिकिटे मिळण्याची संधी मिळत नाही. आमदार - खासदारांना स्वातंत्र्य दिले पाहिजे

भारतात केवळ राजकीय पक्षांमध्ये लोकशाही भावनेचा अभाव नाही. उलटपक्षी जनतेने निवडून दिलेले लोकप्रतिनिधीही लोकशाही प्रक्रियेत सहभागी होण्यास मोकळे नाहीत. १९८५ च्या पक्षांतरविरोधी कायद्यात असे म्हटले आहे की पक्षाच्या आमदार आणि खासदारांनी त्यांच्या पक्षाने जारी केलेल्या व्हिपचे पालन केले पाहिजे. पक्ष अनेकदा केंद्रीय नेतृत्वाच्या सोयीनुसार आणि गरजेनुसार व्हिप जारी करतात. आमदार-खासदारांचा बेलगाम घोडेबाजार थांबवण्यासाठी पक्षांतर विरोधी कायदा करण्यात आला. कारण, असे करून अनेक पक्षांनी निवडणुकीत पराभव होऊनही घरातच बहुमताची मांडणी केली होती. पण, अलीकडच्या काळात आपल्या देशात आमदार, खासदार, नेते यांची पद्धत अनेक वेळा बदलली आहे. यावरून हे स्पष्ट होते की पक्षांतर रोखण्यासाठी हा कायदा ज्या उद्देशाने बनवण्यात आला होता तो साध्य करण्यात हा कायदा पूर्णपणे अपयशी ठरला आहे. उलटपक्षी दलबदलविरोधी कायद्यामुळे पक्षांतर्गत लोकशाही व्यवस्था प्रस्थापित करण्याचे बरेच नुकसान झाले आहे, हे सत्य आहे. कारण, या कायद्यानुसार कोणत्याही राजकीय पक्षाच्या आमदार आणि खासदारांना त्यांच्या पक्षाच्या हायकमांडच्या आदेशाचे घरामध्ये पालन करणे बंधनकारक करण्यात आले आहे. त्यामुळे निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींना कोणत्याही विषयावर किंवा विधेयकावर मतदान करण्याचा अधिकार संपुष्टात आला आहे. त्यांना फक्त त्यांच्या नेतृत्वाच्या आदेशाचे पालन करण्यास भाग पाडले गेले आहे. याचा एक परिणाम असाही झाला आहे की, कोणत्याही पक्षाचे आमदार-खासदार आपल्या कृत्याबद्दल जनतेला नव्हे, तर हायकमांडला उत्तरदायी बनले आहेत. तर आमदार-खासदार ज्या भागातून निवडून आले आहेत, तेथील जनतेला जबाबदार असायला हवे होते.

प्रबळ राजकीय इच्छाशक्तीची गरज आहे

भारतातील राजकीय पक्षांमध्ये अंतर्गत लोकशाही नसल्यामुळे देशातील संसदीय लोकशाहीच्या सुरळीत कामकाजावर वाईट परिणाम होत आहे. निष्पक्ष आणि मुक्त अंतर्गत निवडणुकांचा अभाव, पक्षाच्या तिकीट वाटपात पारदर्शकता नसणे, निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची माहिती नसणे आणि निवडणूक खर्चाबाबतची अपारदर्शकता यामुळे आज राजकीय पक्षांतर्गत लोकशाही प्रक्रिया पूर्ववत होण्याची गरज आहे.याबाबत गंभीर चर्चा होत आहे. लोकांमध्ये चालू आहे. जेणेकरून राजकीय पक्षांमध्ये सुधारणा सुरू करता येतील.

सत्य हे आहे की पक्षांतरविरोधी कायद्यामुळे पक्षांतर्गत लोकशाही व्यवस्था प्रस्थापित करण्याचे बरेच नुकसान झाले आहे. कारण, या कायद्यानुसार कोणत्याही राजकीय पक्षाच्या आमदार आणि खासदारांना त्यांच्या पक्षाच्या हायकमांडच्या आदेशाचे घरामध्ये पालन करणे बंधनकारक करण्यात आले आहे.

या लेखात सुधारणा करण्याचे सुचवले आहे, तशाच सूचना अनेक सरकारांनी निवडणूक प्रक्रियेत सुधारणा करण्यासाठी स्थापन केलेल्या समित्यांनी दिल्या आहेत. जसे दिनेश गोस्वामी समिती, तारकुंडे समिती आणि इंद्रजित गुप्ता समिती इ. या सर्व समित्यांनी राजकीय पक्षांच्या कामकाजात पारदर्शकता आणण्यासाठी आवश्यक पावले उचलण्याची सूचना केली आहे. १९९९ मधील कायदा आयोगाच्या अहवालात राजकीय पक्षांमध्ये लोकशाही प्रक्रिया पाळल्या जातात याची खात्री करण्यासाठी एक नियामक प्रणाली तयार करण्याची गरज असल्याचे जोरदारपणे सुचवले होते. राजकीय पक्षांची नोंदणी आणि त्यांच्या अंतर्गत घडामोडींचे नियमन करण्यासाठीच्या विधेयकाचा मसुदाही केंद्रीय कायदा मंत्रालयाकडे सादर करण्यात आला होता. या मसुद्यात प्रत्येक राजकीय पक्षाची कार्यकारिणी स्थापन करण्याचा प्रस्ताव होता. पक्षाच्या राज्य युनिटच्या स्थायी समित्यांमधून सदस्यांची निवड करण्याची सूचना करण्यात आली होती. त्यानंतर ही कार्यकारिणी आपल्या सदस्यांमधून पक्षाच्या संघटना पदाधिकाऱ्यांची निवड करेल. आणि त्यासाठी कोणाचीही उमेदवारी स्वीकारू नये, अशी सूचना केली होती. मात्र राजकीय पक्ष या मार्गदर्शक तत्त्वाचे पालन करतात काय हा खरा प्रश्न आहे.. कोणत्याही लोकशाहीत सरकारचा लगाम राजकीय पक्षांच्या हातात असतो. अशा परिस्थितीत लोकशाही मजबूत करण्यासाठी राजकीय पक्षांतर्गतच प्रबळ राजकीय इच्छाशक्तीची गरज आहे. तरच भारतातील राजकीय पक्षांना कोणत्याही लोकशाही देशाच्या अपेक्षांनुसार साचेबद्ध आणि लोकशाही बनवता येईल.

# कार्यकर्तेच संघटनेचा आत्मा : आ. जोरगेवार

## शेकडो युवकांचा यंग चांदा ब्रिगेडमध्ये प्रवेश

आधुनिक केसरी न्यूज




**चंद्रपूर :** यंग चांदा ब्रिगेडच्या माध्यमातून सामाजिक क्षेत्रात मोठे काम केल्या जात आहे. कोरोना काळात यंग चांदा ब्रिगेडच्या कार्यकर्त्यांनी उल्लेखनीय काम केले. विविध सामाजिक उपक्रमाच्या माध्यमातून समाजाची सेवा करण्याचे काम यंग चांदा ब्रिगेडच्या वतीने सुरु आहे. यंग चांदा ब्रिगेडचे कार्यकर्ते शेवटच्या गरजूपर्यंत पोहचून त्यांच्या अडचणी सोडविण्याचे काम करत असून कार्यकर्तेच संघटेची आत्मा असल्याचे प्रतिपादन आमदार किशोर जोरगेवार यांनी केले.

लालपेठ येथील हेल्थ क्लब येथे आयोजीय संघटना प्रवेश कार्यक्रमात आमदार किशोर जोरगेवार यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून ताहिर हुसेन यांच्यासह शेकडो युवकांनी यंग चांदा ब्रिगेड मध्ये प्रवेश केला. या प्रवेश कार्यक्रमात ते बोलत होते. या कार्यक्रमाला यंग चांदा ब्रिगेडचे जिल्हा महानगर अध्यक्ष पंकज गुप्ता, युवा नेते अमोल शेंडे, अल्पसंख्याक आघाडीचे युथ शहर अध्यक्ष राशेद हुसेन, शहर संघटक देवा कुंटा, संजय कासर्ला, राम जंगम, अब्बास हुसेन, करणसिंह बैस, प्रसिद्धी प्रमुख नकुल वासमवार आदी मान्यवरांची मंचावर उपस्थिती होती. यावेळी पूढे बोलताना आ. जोरगेवार म्हणाले कि, यंग चांदा ब्रिगेडमध्ये मोठ्या संख्येने युवक शामील होत आहे. सामाजिक क्षेत्रात संघटना उल्लेखनीय कार्य करत आहेच मात्र या सोबतच या संघटनेच्या माध्यमातून नागरिकांचे अधिकाधिक प्रश्न सोडविण्याचा आमचा मानस आहे. आजच्या युवकांनी समाजिक क्षेत्रात आवडीने काम केले पाहिजे. परिसरातील समस्या आमच्या पर्यंत पोहोचविल्या पाहिजे. युवकांच्या अडचणी आपण आमच्या पर्यंत पोहोचविल्या पाहिजे असे आवाहण यावेळी बोलताना आमदार किशोर जोरगेवार यांनी नवनियुक्त सदस्यांना केले.

यंग चांदा ब्रिगेडच्या वतीने स्वयंरोजगार निर्मितीसाठी मोठे काम केल्या जात आहे. महिलांना स्वयमरोजगारातून आर्थिक सक्षम करण्यासाठी आपण विविध प्रकारचे प्रशिक्षण देण्याचे काम करत आहोत. युवकांनाही प्रशिक्षीत करण्याचा संकल्प आपण केला आहे. यात मोबाईल रिपेअरिंगसह इतर प्रकारचे प्रशिक्षण दिल्या जाणार असल्याचेही यावेळी बोलताना आमदार किशोर जोरगेवार म्हणाले. आज प्रवेश करणा-या युवकांची जबाबदारी वाढली आहे. आपण युवा आहात युवकांची संघटनेला गरजही आहे. त्यामुळे समाजाला न्याय मिळवून देण्याची भुमिका आपली असली पाहिजे. परिसरात सामाजिक उपक्रम राबवत संघटनेच्या माध्यमातून सामाजिक कार्यात आपण अग्रसर राहिले पाहिजे. असे यावेळी ते म्हणाले. सदर प्रवेश कार्यक्रमात लालपेठ सह, बाबूपेठ आणि भिवापूर येथील शेकडो युवकांनी संघटनेत प्रवेश केला. यावेळी संघटनेचा दुपट्टा घालून आमदार किशोर जोरगेवार यांनी नवनियुक्त सदस्यांचे संघटनेत स्वागत केले. या कार्यक्रमाला प्रकाश एलटम, जॉन बोलीवार, अश्वीन सल्लम, आशिस गोडसल, शंकर अड्डूर, दाउत सिध्दीकी, राकेश राप्पेलीवार, मोहन बेल्लंमपल्ली, व्यकटेश बेल्लंमपल्ली, सुरज बोल्लम, फैजान कुरेशी, दानेश शेख, स्वरुप दुर्गे, केतन सोवे, साजिद शेख, नविन दुर्गे, लक्की कुंभर, सारंग सिंह राजपूत, शुभर नक्षीणे, अभिजित गिरी, कुणाल सिंग, प्रशांत रत्नपारखी, स्वप्नील पाटील, मुकेश भसारकर, दादू चैव्हाण, नम्मू शेख यांच्यासह इतर कार्यकर्त्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# ऋण फेडणारा विद्यार्थी घडावा : मुनगंटीवार

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** शिक्षण हे केवळ पुस्तकी नव्हे तर संस्कारी असावे. आपण समाजाचे कोणीतरी लागतो, या भावनेतून संस्कारी शिक्षण घेऊन ऋण फेडणारा विद्यार्थी या अभ्यासिकेतून घडावा, अशी अपेक्षा राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्य व्यवसाय मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी व्यक्त केली.
वरोरा येथील श्रद्धेय अटल बिहारी वाजपेयी अभ्यासिकेचे लोकार्पण करताना ते बोलत होते. यावेळी मंचावर माजी भाजपा जिल्हाध्यक्ष देवराव भोंगळे,भाजपा तालुका अध्यक्ष डॉ भगवान गायकवाड,माजी नगराध्यक्ष एहतेशाम अली,श्रीमती जोगी,वरोरा विधानसभा प्रभारी रमेश राजुरकर,नगरपालिकेचे मुख्याधिकारी गजानन भोयर,अभिजित मोटघरे, सूरज पूनवटकर, बाबासाहेब भागडे,आकाश वानखेडे, अमित गुंडावार,ओम मांडवकर,अमित चवले, सुरेश महाजन,सागर वझे,आकाश भागडे आदी उपस्थित होते.
श्रद्धेय अटल बिहारी वाजपेयी ई- अभ्यासिकेचे लोकार्पण झाले असे सुरुवातीला घोषित करून पालकमंत्री श्री मुनगंटीवार म्हणाले, नगरपालिकेने अतिशय चांगले नियोजन करून ही अभ्यासिका उभी केली आहे. रस्ता, पूल या भौतिक सुविधेच्या गोष्टी थोड्या उशिरा तयार झाल्या तरी जास्त फरक पडत नाही, मात्र देशाचे भविष्य घडविणारे विद्यार्थी जेथे तयार होतात, अशा शैक्षणिक सुविधा त्वरित उभ्या करणे आवश्यक आहे. इतर देशात आर्थिक संपन्नता, भौतिक संसाधने आदी गोष्टी मुबलक प्रमाणात असल्या, तरी तेथील जीवन हे सुखी- संपन्नच राहील, याची शाश्वती नाही. मात्र आपला देश, आपला समाज हा कुटुंबवत्सल आहे. हेच संस्कार आपल्याला सुरुवातीपासून मिळाले आहेत. त्यामुळे आजच्या विद्यार्थ्यांना अशा संस्कारी शिक्षणाची गरज आहे. शेवटी देशाच्या गुणसंपन्नतेवरच आनंदाचा इंडेक्स ठरत असतो. पुढे पालकमंत्री म्हणाले, चंद्रपूर हा वाघांचा जिल्हा आहे. त्यामुळे येथील विद्यार्थ्यांनी शिक्षणात वाघासारखाच पराक्रम करावा.



# पोटाची खळगी भरण्यासाठी धडकी भरवणारी कसरत

आधुनिक केसरी न्यूज

**वडोद बाजार :** येथील सोमवारच्या आठवडी बाजारात वडोद बाजार येथे पोटाची खळगी भरण्यासाठी दोरीवर चालण्याचे कसरत करून दाखवत असताना पाहणाऱ्यांच्या मात्र जीवात धडकी भरत होती. दोरीवर चालण्याची कसरत दाखवून प्रेक्षकांच्या टाळ्यांचा प्रतिसाद ऐकत पाहणाऱ्यांनी दिलेल्या बक्षिसावर त्यांचे जीवन चालत असते. अल्पवयीन मुलांनी काम करणे हा कायद्याने गुन्हा समजला जातो. पण पोटाची खळगी भरण्यासाठी आजही काही भटक्या जमातीतील अल्पवयीन मुले-मुली दोरीवरची कसरत करताना दिसत आहेत. खरे तर याचा विचार करून सरकारी यंत्रणाने या घटकांसाठी योग्य ती दिशा देऊ करणे गरजेचे आहे.
पाठीवर बिऱ्हाड घेऊन भटकंती करणारे हे भटक्या जमातीतील डोंबारी, पोटाची खळगी भरण्यासाठी गावोगावी जाऊन कसरतीचे खेळ दाखवतात. त्यात अवघ्या 6 ते 7 वर्षाची मुलगी जीव धोक्यात घालून दोरीवरची कसरत करते. काळजाचा ठोका चुकविणारे तिचे दोरीवरचे खेळ उपस्तीतांची टाळ्यांची दाद मिळवून जातात. बक्षिसरुपी पैसे व शाबासकीही मिळते. मात्र, त्या अल्पवयीन मुलीच्या भवितव्याचे काय असा प्रश्न खेळ पाहणाऱ्या प्रत्येकाच्या मनात निर्माण होतो.

# आतापर्यंतच्या सर्व सप्ताहांचे उच्चांक मोडले

## वैजापूरच्या १७६ व्या सप्ताहात ५ लाखांच्यावर भाविकांनी घेतला महाप्रसाद

आधुनिक केसरी न्यूज



**शांताराम मगर**

**वैजापूर :** योगीराज सदगुरू श्री गंगागिरीजी महाराज यांच्या १७६व्या अखंडहरिनाम सप्ताहाच्या सांगता दिनी सोमवार रोजी अहमदनगर, नाशिक, छत्रपती संभाजीनगर व इतर जिल्ह्यातील ५ लाखांवर भक्त भाविकांनी शेवटच्या दिनी काल्याच्या महाप्रसाद घेण्या सोबत कीर्तनाचा ही लाभ घेतला. आता पर्यंत १७५सप्ताह झाले. परंतु या सप्तत्या एवढी अलोट गर्दी कधीही झाली नसल्याचे गोदाधामचे मठाधिपती हभप रामगिरी महाराज यानी आपल्या कीर्तनातून सांगितले. २१ऑगस्ट रोजी हा सप्ताह सुरू झाला. सोमवार रोजी काल्याच्या किर्तनाने सांगता झाली,रामगिरी महाराज म्हणाले की,अखंड हरिनाम सप्ताह म्हणजे सत्संगाचा कुंभमेळा होय, काल्याच्या महाप्रसाद बाबत महाराज म्हणाले की, परमात्माशी एकरूप होऊन भक्तांना हा काल्याचा प्रसाद खाण्याचा अधिकार आहे.तो भगवंताला नाही. या प्रसंगी राज्याचे महसुल मंत्री ना,राधाकृष्ण विखे पाटील, ग्रामविकासमंत्री ना,गिरीश महाजन, माजी महसूल मंत्री बाळासाहेब थोरात, माजी विधानसभा अध्यक्ष हरिभाऊ नाना बागडे, यांची विशेष उपस्थिती होती. या तिन्ही मान्यवरांनी आपल्या मनोगतात, राज्यात खूप पाऊस पडू दे,नदी,नाले, धरण विहिरी तुडुंब भरू दे ,अशी प्रार्थना भगवंत चरणी करावी अशी विनंती केली,ग्रामविकास व पर्यटन मंत्री महाजन यांनी बेटाच्या विकासासाठी व रत्यासाठी १५ दिवसांत योग्य निर्णय घेऊन हे दोन्ही काम पूर्ण करून देण्याचे आश्वासन दिले, काल मुख्यमंत्री ना एकनाथराव शिंदे यांनी बेटाच्या विकाससाठी १५ कोटी देणार असल्याचे सांगितले. केंद्रीय अर्थ राज्यमंत्री ना,भागवत कराड, पालक मंत्री संदीपान भुमरे, पुरवठा मंत्री छगन भुजबळ, अल्पसंख्याक मंत्री अब्दुल सत्तार यांनी ही सप्ताह स्थळी भेटी दिल्या. खा. इम्तियाज जलील व खा. सुजय विखे पाटील सह आजी माजी आमदार,आजी माजी खासदार यांनीही भेटी दिल्या. आ.रमेश पा,बोरनारे, कार्याध्यक्ष साबेरखान, कार्याध्यक्ष डॉ. दिनेश परदेशी, बाळासाहेब संचेती, सचिव बाबासाहेब जगताप यांनी आलेल्या मान्यवरांचे स्वागत केले. या सूत्र संचलन धोंडीरामसिंह राजपूत यांनी केले तर सप्ताह कमेटीच्यावतीने आ. रमेश पा.बोरनारे यांनी मानले, कमेटीचे नगराध्यक्ष शिल्पाताई परदेशी, सर्वश्री भगवान तांबे,लिमेश वाणी,राजेंद्र साळुंके, पारस घाटे, कल्याण दागोडे दिनेश राजपूत, ज्ञानेश्वर जाधव,सजन गायकवाड, उमाकांत ठोंबरे, शेख अकिल, महेश बुनगे, सोनू बंगाळ, शैलेश चव्हाण, स्वप्नील जेजुरकर, पंकज ठोंबरे सर्व नगरसेवक, तालुक्यातील सरपंच, उपसरपंच, शाळा,महाविद्यालयात शिक्षक व महिला मंडळ, तरुण मंडळ, शहर व तालुक्यातील सर्वांनी सेवादान दिले.

# ई- पीक पाहणी करून घ्यावी

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यात व सावळदबारा परिसरातील शेतकऱ्यांचा सध्या ई-पिक पाहणीचा हंगाम सुरू आहे. सोयगाव तहसीलदार, मंडळ अधिकारी व तलाठ्यांच्या माध्यमातून प्रत्येक शेतकऱ्यांना आवाहन करण्यात येत आहे की,त्यांनी आपल्या पिकाची शेतामध्ये जाऊन ई-पिक पाहणी लवकरात लवकर करून घ्यावी अन्यथा शासनाकडून कोणताही लाभ मिळणार नाही.असे आवाहन सोयगाव तहसीलदार मोहनलाल हरणे यांनी केले आहे.
शासनाने शेतकऱ्यांना मोबाईल वरती लिपिक पाहणी आणि अनिवार्य केली आहे. चालू खरीप हंगामातील ई पिक पाहणीची मुदत ता.३० ऑगाष्ट पर्यंत असून ही ई पीक पाहणी अँड्रॉइड मोबाईलच्या माध्यमातून करायची आहे. शेतकऱ्यांनी विहित कालावधीमध्ये ही ई पिक पाहणी न केल्यास संभाव्य तोटा होऊ शकतो.पीक विमा मिळण्यास अडचण,पी.एम.किसान योजना,सोसायटी किंवा बँकेकडून पीक कर्ज मिळण्यास अडचण,अतिवृष्टी नुकसान भरपाई,गारपीट नुकसान भरपाई,कांदा अनुदान इत्यादी अनेक शासकीय योजनेसाठी पिक पाहणी आवश्यक आहे.ई पीक पाहणी न केल्यास सदर जमीन पडीक आहे म्हणुन नोंद लागेल.पिक पाहणीचे महत्त्व शेतकऱ्यांना पाठवून देण्यासाठी महसूल विभागाकडून ठिकठिकाणी माहितीपत्रके, भीतीपत्रके व तसेच सोशल मीडियावर तसेच गावोगावी मोठ्या प्रमाणात जनजागृती केली जात आहे असे असताना सुद्धा शेतकरी ई पीक पाहणी करण्यासाठी उदासीन असल्याची परिस्थिती सोयगाव तालुक्यात पाहायला मिळत आहे.



# सेवानिवृत्तीच्या वाढीव मानधनाचा आणि श्रमिक पत्रकारांचा शासन निर्णय तातडीने काढा

## व्हॉईस ऑफ मीडिया वाशीम जिल्ह्याच्या वतीने मुख्यमंत्र्यांना निवेदन

आधुनिक केसरी न्यूज

**वाशीम :** राज्याचे मुख्यमंत्री ना. एकनाथ शिंदे यांनी मंत्रीमंडळात घोषणा केल्याप्रमाणे पत्रकारांना सेवानिवृत्तीनंतर देण्यात येणाऱ्या वाढीव मानधनाचा आणि टीव्ही, रेडियो व सोशल मीडियात काम करणाऱ्या पत्रकारांना श्रमिक पत्रकार म्हणून समावेशाचा शासन निर्णय तातडीने निर्गमित करण्यासह इतर अनेक मागण्यांसाठी व्हॉईस ऑफ मिडीया जिल्हा शाखा आणि सर्व विंगच्या वतीने राष्ट्रीय अध्यक्ष संदीप काळे, प्रदेशाध्यक्ष अनिल मस्के यांच्या मार्गदर्शनात व जिल्हाध्यक्ष भागवत मापारी आणि वरिष्ठ पदाधिकारी यांच्या नेतृत्वात सोमवार, २८ ऑगष्ट रोजी जिल्हाधिकारी यांच्यामार्फत मुख्यमंत्र्यांना निवेदन पाठविण्यात आले. लोकशाहीचा चवथा आधारस्तंभ असलेल्या राज्यातील पत्रकारांना अधिस्विकृती, शासकीय जाहिराती, अधिकृत



पत्रकार नोंदणी कार्ड, स्वतंत्र महामंडळ, पत्रकार पुरस्कार, सेवानिवृत्तीचे मानधनाचा शासन निर्णय, श्रमिक पत्रकारांचा शासन निर्णय, अधिस्विकृतीच्या जाचक अटी रद्द करणे, सोशल मिडीया पत्रकारीतेसाठी पॉलीसी, सोशल मिडीयासाठी जाहिराती, पत्रकारांना शासकीय विमा कवच आदी विविध मागण्यांसाठी व्हॉईस ऑफ मिडीयाच्या वतीने राष्ट्रीय अध्यक्ष संदीप काळे यांच्या मार्गदर्शनात राज्यातील सर्व जिल्हयात एकाच दिवशी धरणे आंदोलन करुन मुख्यमंत्र्यांना निवेदन देण्यात येत आहे. त्याबाबत कमिटी नेमून ज्यांचे ज्यांचे प्रस्ताव रखडले आहेत, ते मार्गी लावावेत, सर्व ठिकाणी वेगाने वाढणाऱ्या आणि भविष्यात पत्रकारितेची नांदी असणाऱ्या सोशल मीडिया पत्रकारितेसाठी तातडीने जाहिरातींबाबत पॉलिसी बनवावी, सोशल मीडियांनाही जाहिराती देण्याबाबत तातडीने निर्णय घ्यावा, ज्यांनी पत्रकारितेत किमान दोन वर्ष पूर्ण केली आहेत, अशा प्रत्येक पत्रकार आणि त्यांच्या कुटुंबीयांना विमा सुरक्षा कवच देण्यासंबंधीच्या सूचना प्रत्येक नोंदणी असलेल्या माध्यमाच्या मालकांना देण्यात याव्यात. सरकार आणि राज्य कामगार विभाग यांना या सूचनांचे पालन काटेकोर करण्याबाबत मार्गदर्शिका द्यावी, आदी मागण्या मांडण्यात आल्या आहेत.

पत्रकारांच्या हितासाठी सदरहू मागण्यांबाबत त्वरीत पावले उचलून पत्रकारांचे प्रश्न मार्गी लावावे अशी विनंती करण्यात आली आहे.

निवेदन देताना रेडीओ विंगचे प्रदेशाध्यक्ष इरफान सय्यद, साप्ताहिक विंगचे कार्याध्यक्ष गजानन धामणे, विदर्भ कार्याध्यक्ष विठ्ठल देशमुख, विदर्भ कार्यवाहक धनंजय कपाले, इलेट्रॉनिक विंगचे जिल्हाध्यक्ष किशोर गोमासे, जिल्हा प्रवक्ता आर.जे. देव, पंकज गाडेकर, गणेश मोहळे, शितल धांडे, जिल्हा कार्याध्यक्ष सुनिल पाटील, रवि खडसे, प्रविण पट्टेबहादूर, आशिष धोंगडे यांच्यासह संघटनेचे पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते.

# २० पिस्तुलांसह तीन जणांना अटक

आधुनिक केसरी न्यूज

**अमरावती :** मध्यप्रदेश सीमेजवळील खकनार नजीक देशी बनावटीच्या २० पिस्तुलांसह तीनजणांना बऱ्हाणपूर पोलिसांनी अटक केल्याने शस्त्रांच्या तस्करीसाठी कुप्रसिद्ध असलेले सातपुडा पर्वतरांगातील पाचोरी हे गाव पुन्हा एकदा चर्चेत आले आहे. या गावात अवैध शस्त्रांची निर्मिती होते. सिकलीगर नावाने ओळखले जाणारे लोक या शस्त्रांची विक्री करताना यापूर्वीही अनेकवेळा पोलिसांच्या तावडीत सापडले आहेत, पण आता त्यांनी दलालांना सक्रिय करून शस्त्रांची विक्री सुरू केल्याचे निदर्शनास आले आहे.

मध्यप्रदेश पोलिसांना अवैध शस्त्रांच्या तस्करीची गोपनीय माहिती मिळाल्यानंतर पांगरी फाट्यानजीक पोलिसांनी नाकेबंदी केली. यावेळी पोलिसांनी मोटरसायकलवरून जात असलेल्या दोघांना अडवून चौकशी केली. झडती घेतल्यावर दोघांकडे आठ पिस्तूल आढळले. त्यांना पोलिसांनी अटक केली. आरोपींनी एका दलालाकडून आपण ही शस्त्रे खरेदी केल्याचे पोलिसांनी सांगितले. त्याआधारे नांदुरा कला येथे राहणाऱ्या दलालाच्या घरावर पोलिसांना छापा टाकला. त्याच्याकडून १२ अवैध पिस्तूल जप्त करण्यात आले. जप्त करण्यात आलेल्या पिस्तुलांची किंमत २ लाख रुपये आहे. दलालाने पिस्तुलांची खरेदी पाचोरी येथून केल्याचे सांगितले.

# शेगावात पन्नास हजारांवर भाविक

आधुनिक केसरी न्यूज

**बुलढाणा :** साप्ताहिक सुट्या व एकादशीचा जुळून आलेला योग यामुळे विदर्भ पंढरीत सुमारे पन्नास हजार भाविकांची मांदियाळी जमली. सलग दोन दिवस शेगावातील गजानन महाराज मंदिरासह रस्ते आबालवृद्ध भाविकांनी फुलल्याचे दिसून आले. पवित्र श्रावण मास आणि ऑगस्ट महिन्यातील चौथा शनिवार, रविवार अशी सलग सुटी आली. त्यातच रविवारी पुत्रदा एकादशीचा आली. हजारो भाविक दर एकादशीला 'वारी' करतात. लागोपाठ दोन दिवस शासकीय कार्यालय व बँकेला सुट्या आहेत. विद्यालयांना देखील सुट्या असल्याने भाविकांनी गजानन महाराजांच्या दर्शनासाठी एकच गर्दी केली. बाहेरगावावरून खासगी वाहन, एसटी बसेस तसेच रेल्वेने प्रवास करून हजारो भाविक संतनगरी शेगावात पोहोचले.

# शेतकरी गटाने घेतली प्रयोगशील शेतकरी दीपक चव्हाण यांची भेट

आधुनिक केसरी न्यूज

**सुलतानपूर :** येथील प्रयोगशील शेतकरी  दीपक चव्हाण यांच्या शेतावर खुलताबाद तालुक्यातील अनेक महिला व पुरुष शेतकरी गटाने भेट देऊन कापूस मका सोयाबीन टोमॅटो, कलिंगड, आले इत्यादी पिकाचे प्रत्यक्षात पाहणी केली. पानी फाउंडेशन आयोजित सत्यमेव जयते फार्मर कप स्पर्धा२०२३  मध्ये अतिशय चुरशीचा सामना खुलताबाद तालुक्यामध्ये दिसून येत आहेत. या स्पर्धेतील एकूण ५० गटांनी सुलतानपूर येथे भेट देऊन माहिती मिळवली त्याचप्रमाणे इतर गटांच्या पिकांच्या बाबतीत माहितीची देवाण-घेवाण करून खर्च कमी उत्पादन कसे वाढवता येईल पाऊस कमी असेल तर कुठल्या गोष्टी चे नियोजन करावे एकात्मिक कीड व्यवस्थापन यातून विषमुक्त अन्न कसे करता येईल, यासाठी  दीपक चव्हाण यांनी मार्गदर्शन केले. एकून २५ गावातील ५० गटांतून १५०शेतकऱ्यांनी भेट दिली. सत्यमेव जयते फार्मर काप स्पर्धेत विजेत्या गटाला १५लाख १०लाख ५ लाख एव्हढ बक्षीस दीले जाणार आहे, त्याचबरोबर महिलाना सुद्धा



बक्षीस दिले जाणार आहे, बक्षिसापेक्षा गटाची एकजूट शेतीतील येणाऱ्या अनेक संकटाना तोंड देताना दिसून येत आहे. हजारो लीटर दशपर्णी अर्क, निमारक, चिकट सापळे, कामगंध सापळे लागवडी मुळे खर्च कमी झाला आहे आणि पिक पण जोमदार आहेतः, शिवाय निसर्ग व मातीची सुपिकताही वाढताना दिसून येत आहे. यावेळी त्यांचे बंधू सुभाष चव्हाण व वडील पांडुरंग चव्हाण पानी फाउंडेशनचे जिल्हा समन्वयक प्रल्हाद आरसुळ, तालुका समन्वयक ज्ञानेश्वर इधाटे श्रद्धा ठोंबरे  उपस्थीत होते.

# सुसज्ज व उत्तम कार्यालयामुळे नागरिकांना सुलभ शासकीय सेवा मिळू शकेल : सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण

आधुनिक केसरी न्यूज

**हेमंत धायगुडे**

**पनवेल :** सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सार्वजनिक बांधकाम विभागीय कार्यालय पनवेल आणि उपविभागीय कार्यालय पनवेल क्रमांक एक व पनवेल क्रमांक दोन, भिंगारी प्रस्तावित कार्यालयीन इमारतीचे भूमिपूजन आज सार्वजनिक बांधकाम मंत्री (सार्वजनिक उपक्रम वगळून) रविंद्र चव्हाण यांच्या हस्ते भिंगारी, ता.पनवेल येथे झाले. यावेळी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या उपस्थित अधिकाऱ्यांशी आणि कर्मचाऱ्यांशी संवाद साधला.

या कार्यक्रमास आमदार प्रशांत ठाकूर, मा. कोकण म्हाडा सभापती बाळासाहेब पाटील, प्रदेश भाजप सरचिटणीस विक्रांत पाटील, मुख्य अभियंता सा. बां. प्रादेशिक विभाग कोकण, शरद राजभोज, अधीक्षक अभियंता रायगड  श्रीमती सुषमा गायकवाड, अधीक्षक



अभियंता श्रीमती रुपाली पाटील, सुखदेवे तसेच सबंधित विभागाचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

सार्वजनिक बांधकाम विभागाची विभागीय कार्यालय ही चांगली व सुसज्ज असली पाहिजे. यामुळे कार्यालयीन अधिकाऱ्यांच्या व कर्मचाऱ्यांचा कार्यक्षमतेमध्ये नक्कीच वाढ होईल. तसेच येथील राहणाऱ्या स्थानिक नागरिकांना या सुसज्ज व चांगल्या कार्यालयाचा नक्कीच फायदा होईल व नागरिकांना सुलभ शासकीय सेवा मिळू शकेल असे चव्हाण यावेळी म्हणाले. सार्वजनिक विभागाची सर्वच विभागीय कार्यालय अशाच पद्धतीने सुसज्ज व उत्तम आणि दर्जेदार करण्याचा मानस असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

# महामार्गावर अनोखे आंदोलन

आधुनिक केसरी न्यूज

**भंडारा :** भंडारा ते भंडारा रोड रेल्वेस्थानकापर्यंत दररोज शेकडो नागरिक प्रवास करतात. मात्र, या मार्गाने जाताना जीव मुठीत घेऊनच प्रवास करावा लागतो. या मार्गावर दररोज अपघात होत असून अनेकांना आपला जीव गमवावा लागला आहे. या गंभीर बाबीकडे प्रशासनाचे लक्ष वेधून घेण्याकरिता परिसरातील त्रस्त प्रवासी, सामाजिक कार्यकर्ते व ऑटो रिक्षा चालक-मालक संघटनेच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी युवा सामाजिक कार्यकर्ते कृष्णा भुजबळ यांच्या वाढदिवसानिमित्त दाभा मार्गावरील मोठमोठ्या खड्ड्यांमध्ये वृक्षारोपण करत खड्ड्यांमध्ये बसून केक कापून अनोख्या पद्धतीने आंदोलन केले.

या महामार्गावर मोठमोठे खड्डे पडलेले



असून जामिनी ते वरठी मार्गावर जीवघेणे खड्डे आहेत. रस्ता दुरुस्तीसठी वारंवार निवेदन देण्यात आले. मात्र प्रशासनाकडून त्याकडे दुर्लक्ष केले जात असल्याचा आरोप करीत आंदोलन करण्यात आले. यावेळी हेमंत रघुते, गोवर्धन निनावे, सुधीर सार्वे, इस्तारी, ज्ञानेश्वर वैद्य, अजय रामटेके, ज्येष्ठ नागरिक गणेश पिपरोडे, कवडू घुले, दामोदर हुमने, सूर्यवंशी व सर्व त्रस्त प्रवासी, परिसरातील सामान्य नागरिक उपस्थित होते.

# डॉ. हेडगेवार रुग्णालयातील अद्ययावत उपकरणांसह रेटिना विभागाची नव्याने सुरुवात

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** शहरातील गारखेडा परिसरातील डॉ. हेडगेवार रुग्णालयात नेत्ररोग विभाग गेल्या २५ वर्षांपासून आहे. डॉ. गोविंद देशमुख या विभागाचे प्रमुख असून ते स्वतः फेको शस्त्रक्रिया विषयातील तज्ञ असून त्यांनी या प्रकारच्या एक हजाराहून अधिक शस्त्रक्रिया आजपर्यंत केल्या आहेत. आता नव्याने रेटिना विभाग  अद्ययावत उपकरणांसह सुरू झाला आहे. गुंतागुंतीच्या रेटिनाच्या आजारावरील सर्व उपचार आता येथे होतील. या विभागात अत्यंत महागडी उपकरणे उपलब्ध करण्यात आली आहेत. रेटिना हा विषय तसा खूप खर्चिक आहे पण  डॉ. हेडगेवार रुग्णालयात हे सर्व उपचार आणि महत्त्वाच्या तपासण्या माफक दरात उपलब्ध केल्या आहेत. तसेच सरकारी योजनेमध्ये समाविष्ट तपासण्या व शस्त्रक्रिया देखील होणार आहेत.  या विभागास 'चिंतामण परांजपे नेत्ररोग विभाग' असे नाव देण्यात आले आहे. एम्स दिल्ली येथून उच्च शिक्षण घेऊन आलेल्या अनुभवी सर्जन डॉ. अभिज्ञा सुर्वे या डॉ. हेडगेवार रुग्णालयातील रेटिना विभाग सांभाळत आहेत. त्यांनी मागील काही वर्षात डोळ्यांच्या अत्यंत गुंतागुंतीच्या व अतिजोखमीच्या शस्त्रक्रिया यशस्वीरित्या केल्या आहेत. या विभागांतर्गत दृष्टीहीनता, दुर्बल दृष्टी, नेत्रविकार व डोळ्यांच्या



विविध समस्या या सर्वांवर उपचार केले जाणार आहेत. ज्यामध्ये प्रामुख्याने आढळून येणारे मोतीबिंदू डोळ्यातील पडद्याच्या गुंतागुंतीच्या व कठीण शस्त्रक्रिया यशस्वी होत आहेत.  या विभागांतर्गत नवजात शिशु अंध्यत्व निवारण (ROP) व दृष्टिदान यांसारख्या दुर्लक्षित विषयावरील प्रकल्प हाती घेण्यात आलेला आहे. या  प्रकल्पाच्या संचालिका डॉ. अभिज्ञा सुर्वे आहेत. ही सुविधा आणि हा प्रकल्प आता फक्त डॉ. हेडगेवार रुग्णालयात उपलब्ध आहे. विशेष म्हणजे या प्रकल्पामुळे योग्यवेळी निदान व उपचार झाल्यास आयुष्यभराचे अंधत्व टाळता येऊ शकते. असा अत्यंत महत्वपूर्ण विभाग डॉ. हेडगेवार रुग्णालयात सुरू झाल्या मुळे डॉ. हेडगेवार रुग्णालयाचे सर्वबाजूने कौतुक होते आहे.  त्याबरोबरच या प्रकल्पामध्ये सामुदायिक आरोग्य व प्रौढामधील अंधुक दिसणे किंवा दृष्टी अधू असणे यावर उपचार व पुनर्वसन करण्याचे काम सुरू झाले आहे. ROP या विषयात ५०० हून अधिक नवजात शिशूंची  तपासणी झाली आहे.  हा विषय फक्त शहरापुरता मर्यादित न राहता ग्रामीण तसेच तालुका पातळीवर काम व्हावे यासाठी मोबाईल क्लिनिक म्हणजेच चल चिकित्सालयामार्फत सेवा देणार आहोत.

# अहमदनगरची घटना माणुसकीला काळीमा फासणारी

## नाना पटोले : आरोपींना तत्काळ अटक करून कठोर कारवाई करावी

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** अहमदनगरच्या श्रीरामपूर तालुक्यातील हेरगाव येथे कबुतर चोरल्याच्या संशयावरून एका दलित तरुणाला अर्धनग्न करून झाडाला बांधून अमानुष मारहाण करण्यात आली. ही घटना माणुसकीला काळीमा फासणारी आहे. भारतीय जनता पक्षाने राजकीय फायद्यासाठी समाजात जो द्वेष पसरवला आहे, त्यातूनच या घटना घडत आहेत. भाजपने देशाच्या सामाजिक ऐक्याला गालबोट लावले आहे अशी घणाघाती टीका महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी केली आहे. अहमदनगर जिल्ह्यातील घटनेचा तीव्र निषेध करून पटोले म्हणाले की, राजकीय फायद्यासाठी भारतीय जनता पक्षाने देशात द्वेषाची बीजे रोवली आहेत त्याचा परिणाम देशवासियांना भोगावे लागत आहेत. भाजपने राजकीय फायद्यासाठी हिंदू आणि मुस्लीम समाजात फूट पाडून दंगली घडवल्या. त्यानंतर भाजपने सवर्ण आणि दलितांमध्ये फूट पाडण्याचे काम सुरु केले आहे. त्यातून अगोदर भीमा कोरेगावची दंगल घडवली. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि भाजपशी संबंधित लोक सातत्याने मुस्लीम आणि दलितांबद्दल द्वेषाची पेरणी करत आहेत. त्यातूनच सामाजिक ऐक्याला तडे गेले असून हेरगाव सारख्या घटना घडत आहेत. या घटनेतील आरोपींना पोलिसांनी तत्काळ अटक करून त्यांच्यावर कठोर कारवाई करण्याची मागणी पटोले यांनी केली. फोडाफोडीचे राजकारण करून केंद्रीय संस्थांचा गैरवापर करून भारतीय जनता पक्षाने महाविकास आघाडीचे सरकार पाडले. शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या काही फुटीरांना सोबत घेऊन सरकार स्थापन केले. अनैतिक मार्गाने सत्तेवर आलेले हे असंवैधानिक आणि भ्रष्ट सरकार सर्वच आघाड्यांवर अपयशी ठरले आहे. सरकारच्या कामगिरीवर यांना मते मागायला तोंड नाही. अनेक सर्वे अहवालांनी भाजपच्या दारुण पराभवाचे भाकीत केले आहे. त्यामुळेच भारतीय जनता पक्ष आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघ धार्मिक तेढ निर्माण करून दंगली घडवण्याचे आणि दलित अत्याचाराचे गुजरात मॉडेल महाराष्ट्रात राबवण्याचा प्रयत्न करत आहे. पण राज्यातील जनता सुज्ञ असून ती भाजपचा कुटील डाव ओळखून आहे, असे काँग्रेस प्रदेशाध्यक्ष म्हणाले.

## सावंगी येथे शाश्वत विकासासाठी पंचायतराज प्रशिक्षण

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील बाजार सावंगी येथे रेणुका माता मंदिर परिसर हॉल मधे राष्ट्रीय ग्राम स्वराज्य अभियान राज्य प्रकल्प व्यवस्थापन कक्ष पुणे व जिल्हा परिषद औरंगाबाद पंचायत राज प्रशिक्षण खामगाव यांच्या संयुक्त विद्यमाने शाश्वत विकास ध्येयाचे स्थानिकीकरण अंतर्गत "थीमॅटीक प्रशिक्षण कार्यक्रम" चे तीन दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रम चे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे उदघाटन पंचायत समिती चे विस्तार अधिकारी यांच्या हस्ते करण्यात आले तीन हा कार्यक्रम सुरु होता. ध्येयाचे स्थानीकीकरण अंतर्गत शाश्वत विकास यात गरिबी निर्मूलन, उपासमारीचे समुळ उच्चेटन, निरोगीपणा क्षेमकुशल, गुणवत्तापूर्ण शिक्षण, लिंग समभाव, स्वच्छ पाणी व स्वच्छता,परवडण्या योग्य व स्वच्छ उर्जा, चांगल्या दर्जाचे डीमॅट व आर्थिक वाढ, उद्योग नाविन्यप्रणाव व सुविधा, शाश्वत शहरे व समुदय, शाश्वत वापर, हवामान क्रिया,पाण्याखालचे जीवन, जमीनीवरचे जीवन, शांती न्याय व सशक्त संस्था, ध्येयासाठी भागीदारी यावर स्थानिक स्तरावर काम करण्याची गरज असुण यासाठी प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते. तीन दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रमांसाठी सरपंच, ग्रामसेवक, अंगणवाडी सेविका यांना प्रशिक्षण देण्यात आले. बाजार सावंगीचे सरपंच आप्पाराव पाटील नलावडे यांच्या सह परिसरातील सरपंच ग्रामसेवक अंगणवाडी सेविका उपस्थित होते.



## नागपूर-शहडोल-नागपूर नवीन रेल्वेगाडी

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** नागपूर-शहडोल-नागपूर नवीन रेल्वेगाडी चालवण्याचा निर्णय रेल्वेने घेतला आहे. गाडी क्रमांक ०८२८७ शहडोल-नागपूर उद्घाटन विशेष २९ ऑगस्टला धावेल. ही विशेष गाडी दुपारी दीड वाजता सुटेल आणि नागपूरला ४ वाजता पोहोचेल. ही गाडी उमरिया, कटनी दक्षिण, जबलपूर, नैनपूर, सिवनी, छिंदवाडा, सौसरमार्गे नागपूरला येईल. त्यानंतर नागपूर-शहडोल एक्स्प्रेस साप्ताहिक गाडीची नियमित सेवा ४ नोव्हेंबरपासून सुरु होईल. ११२०१ नागपूर-शहडोल एक्स्प्रेस नागपूरहून ११.४५ वाजता सुटेल. नागपूरहून दर सोमवारी निघेल आणि दुसऱ्या दिवशी रात्री १२.२९ वाजता शहडोलला पोहोचेल.

## वेश्याव्यवसाय चालवणाऱ्या हॉटेल चालकाविरोधात गुन्हा

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** पोलिस ठाणे हद्दीत छत्रपती संभाजीनगर ते फुलंब्री राष्ट्रीय महामार्गावरील एका खासगी हॉटेलमध्ये दामिनी पथकाने सापळा रचून वेश्याव्यवसाय चालवणाऱ्याविरोधात पिटा अॅक्टनुसार शनिवारी रात्री उशिरा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फुलंब्री पोलिस ठाणे हद्दीत असलेल्या छत्रपती संभाजीनगर ते फुलंब्री महामार्गावरील एका खासगी हॉटेलमध्ये वेश्याव्यवसाय सुरू असल्याची माहिती दामिनी पथकप्रमुख सहायक पोलिस निरीक्षक आरती जाधव यांना मिळाली होती. त्यावरून दामिनी पथकप्रमुख तथा सहायक पोलिस निरीक्षक आरती जाधव यांनी सदरील हॉटेलवर छापा टाकण्यासाठी विशेष पथकाला सोबत घेतले. या पथकात सहायक पोलिस निरीक्षक सुदाम शिरसाठ, पोलिस अंमलदार पठाण, भागीनाथ आहेर, गोपाल पाटील, श्रीकांत दांडगे, महिला पोलिस अंमलदार जयश्री महालकर यांनी हॉटेलवर छापा टाकला असता विकास नाना त्रिभुवन या हॉटेलचालकाला ताब्यात घेतले आहे. सदरील ठिकाणी सापळा रचून छापा टाकला असता वेश्याव्यवसाय सुरू असल्याची खात्री पटली. त्यावरून हॉटेलचालकाला ताब्यात घेऊन दोन पीडित महिलांची सुटका केली आहे. यात मोबाइल, निरोध पाकिटे व रोख रक्कम असा एकूण २३ हजार ६०५ रुपयांचा मुद्देमाल दामिनी पथकाने ताब्यात घेतला. विकास नाना त्रिभुवन याच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे



## प्राणीशास्त्र विभाग जनजागरण सप्ताहाचा समारोप

आधुनिक केसरी न्यूज

**सोनपेठ :** कै. रमेश वरपुडकर महाविद्यालयाच्या प्राणिशास्त्र विभागाच्या वतीने घेण्यात आलेल्या जनजागरण सप्ताहाचा समारोप हशिप्रमंचे संस्थापक अध्यक्ष राजाभाऊ कदम यांच्या स्मृती दिनाचे औचित्य साधून आज करण्यात आलाआज करण्यात आला. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 विषयी व्याख्यान व विविध स्पर्धांचे बक्षीस वितरण यावेळी करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. वसंत सातपुते प्रमुख पाहुण्या प्रा. डॉ. वनिता कुलकर्णी, प्राचार्य डॉ. शेख शकिला, प्रा. संदिप देवराये यांच्यासह प्रा. डॉ. अनंत सरकाळे, प्रा.डॉ. संतोष रणखांब हे मंचावर उपस्थित होते. शहरातील कै. रमेश वरपुडकर महाविद्यालयाच्या प्राणिशास्त्र विभागाच्या वतीने जनजागरण सप्ताहानिमित्त, अंधश्रद्धा निर्मूलन आधारित स्वयं अध्ययन परिक्षा, साथरोग निर्मुलन, भित्तिपत्रक प्रदर्शन, जनजागृती रॅली, माहिती दायक कॉर्नर सभा यांचे आयोजन करण्यात आले होते. दिनांक 17 ते 21 या दरम्यान हा सप्ताह घेण्यात आला. या सप्ताहाचे आयोजन येथील कै. रमेश वरपुडकर महाविद्यालय, दादा पाटील राजळे महाविद्यालय, आदिनाथ नगर ता. पाथर्डी जि. अहमदनगर, कालिकादेवी महाविद्यालय शिरूरकासार जि. बीड यांच्या प्राणीशास्त्र विभागाच्या संयुक्त विद्यमाने तीन दिवसीय व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले होते. आज हनुमान शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष कै. राजाभाऊ कदम यांच्या स्मृतीदिनानिमित्त औचित्य साधून हा समारोप करण्यात आला. याप्रसंगी विविध उपक्रमात प्राविण्य मिळवलेल्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र व बक्षीस वितरण करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मेघा कुरुडे व ममता कुरुडे यांनी केले. तर प्रास्ताविक प्रणिता गायकवाड हिने तर प्रेरणा काळभार हिने मनोगत व्यक्त केले. त्यानंतर गुणवत्ताप्राप्त विद्यार्थ्यांना बक्षिस वाटप प्रा. डॉ. आशोक चव्हाण, प्रा. डॉ. विठ्ठल मुलगीर, प्रा. डॉ. रोहिणी भाग्यवंत, प्रा. आरती बोबडे, प्रा. मंगल गव्हाणे, प्रा. सतिश वाघमारे, प्रा. सुरेश मोरे यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे आभार करण उबाळे याने मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.





## शालेय विद्यार्थ्यांना कृतियुक्त अध्यापन, प्रत्यक्ष बेसिक कन्सेप्ट

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील बाजार सावंगी येथील सह्याद्री इंग्लिश स्कूलमधे गणित विषय शिकविताना प्रत्यक्ष बेसीक कन्सेप्ट मुलाद्वारे कृतीतून कृती युक्त अध्यापन प्रशिक्षक द्वारे शिकवले जात असल्याने मोठ्या उत्साहाने मुले गणित विषय शिकत आहे. सह्याद्री इंग्रजी माध्यमाच्या शाळेत शिक्षकांनी इयत्ता पाचवी व सहावी वर्गासाठी विद्यार्थ्यांच्या मदतीने बालवर्गातील विद्यार्थ्यांना गणित विषय सोपा वाटावा म्हणून शिक्षक बेसीक कन्सेप्ट प्रशिक्षकाद्वारे कृतीतून कृती युक्त अध्यापनाचे धडे शिक्षक देत असल्याने विद्यार्थी मोठ्या उत्साहात धडे गिरवत घेत आहे. याबद्दल शाळा व शिक्षकांचे कौतुक होत आहे.



# ग्रामीण भागातील फॉल्टमुळे वेळोवेळी पुरवठा खंडित

## चारठाणा गाव तासंतास अंधारात

आधुनिक केसरी न्यूज

**चारठाणा :** येथील परिसरातील अनेक छोटे मोठे गावाचा संपर्क येथील महावितरण विद्युत कंपनीचे 33 के व्ही उपकेंद्राअंतर्गत विद्युत पुरवठा पुरवला जातो, येथील उपकेंद्राअंतर्गत विद्युत महावितरण कंपनीकडून पावसाळ्याच्या सुरुवातीलाच विद्युत पुरवठा तारा व रोहीत्रासह अन्य गोष्टीची रिपेरींग, नीटनेटके करणे गरजे असुन ही कामे व्यवस्थित न केल्याने येथील परिसरातील विद्युत ग्राहकांना ऊपकेंद्र आसुन अडचण नसून खोळंबा अशी गत निर्माण होऊन शहरवासीयांना अनेक आडचणीचा सामना करावा लागत आहे. चारठाणा शहराचा विद्युत पुरवठा ग्रामीण भागातील फॉल्ट होत असल्यामुळे वेळोवेळी होतोय खंडित होत असून स्थानिक पातळीवर एकही विद्युत कर्मचारी राहत नाही तसेच या कर्मचार्यांना कडून खाजगी व्यक्ती लाऊन ग्रामीण भागाला विज वितरण करणार्या कनेक्शन पॉईंटवर जाड डिव्ह टाकून ग्रामीण भागात फॉल्ट झाल्यास डिव्ह उडून विद्युत पुरवठा खंडित होउ नये करिता शक्कल लढवली जाते परंतू डिव्ह न उडाल्याने ग्रामीण भागा सह शहराचासुध्दा हॉर्न ग्याप पडून विद्युत पुरवठा खंडित होतो. विज वितरण कंपनीच्या विज तांत्रीकाच्या हलगर्जी पणामुळे व उंठावरुन शेळ्या राखत आसल्यामुळे चारठाणा गाव वाशियांना तासंन तास अंधारात राहण्याची वेळ येत आसुन रात्री अपरात्री आणी पाणी पावसात विद्युत फॉल्ट काढुन अथवा टाकलेला जाड तारेचा डिव्ह काढून विद्युत पुरवठा सुरळीत करण्याची वेळ येथिल तात्पुरत्या कार्यरत आसलेल्या विज तांत्रीकिवर येत आहे मात्र या मुळे मोठी दुर्घटना अथवा जिव धोक्यात येण्याची घटणा नाकारता येत नाही, त्यासाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या बाबतीत गांभिर्याने लक्ष घालून विज वितरण कंपनीच्या कर्मचाऱ्यांची कान उघाडणी करावी व योग्य ते पाउल उचलण्याची मागणी सर्व सामान्य नागरिकांतून होत आहे.

# हेल्मेट वापरा, अन्यथा कारवाईला सामोरे जा!

आधुनिक केसरी न्यूज

**गोंदिया :** जिल्ह्यात वाढते अपघात आणि त्यात होणाऱ्या मृत्यूंची संख्या पाहता पोलीस विभागाने हेल्मेट सक्तीची प्रभावी अंमलबजावणी सुरू केली आहे. याअंतर्गत मागील ५० दिवसांत ५ हजारांहून अधिक दुचाकी वाहनचालकांवर कारवाई करण्यात आली आहे. पोलीस विभागाने कारवाईचा बडगा उगारताच वाहन चालकही आता हेल्मेटला प्राधान्य देत असल्याचे सुखद चित्र आहे.एका सर्वेक्षणानुसार १०० दुचाकी चालकांमागे ८० वाहनचालक हेल्मेट वापरत असल्याचे समोर आले आहे. आता उर्वरित २० टक्के दुचाकी चालकांमध्ये जनजागृतीची गरज आहे. पोलीस विभागाकडून वाहन चालकांना हेल्मेट वापरण्याबाबत मार्गदर्शन केले जात आहे. याचबरोबर हेल्मेट न वापरणाऱ्यांवर कारवाईही केली जात आहे. हेल्मेटचा वापर होत असल्यामुळे अपघाती मृत्यूचे प्रमाणही कमी झाल्याचे दिसून येत आहे. मागील वर्षी जुलै महिन्यात रस्ते अपघातात १४ जणांचा मृत्यू झाला होता, यावर्षी याच कालावधीत ९ जणांनी रस्ते अपघातात आपला जीव गमावला आहे.



# नारी समता दिनानिमित्त कार्यक्रम

आधुनिक केसरी न्यूज

**नांदेड :** भारतात पुरुषप्रधान संस्कृती आहे. मात्र, आज प्रत्येक क्षेत्रात महिलांनी आपला वेगळा ठसा उमटविला आहे. महिलांना कायद्याने पुरुषांसारखे समान अधिकार मिळाले आहेत. परंतु समाजात त्यांच्या स्थानाबाबत असमानता आहे. पुरुषांच्या तुलनेत महिलांबाबत लोकांच्या मनात दुहेरी मानसिकता आहे. आजही समाजात महिलांना पुरुषांच्या बरोबरीने अधिक स्थान मिळत नाही. मात्र, जगभरात महिलांना समान हक्क आणि जागा मिळावी यासाठी प्रयत्न सुरू आहेत. मुलींचे अर्थातच महिलांचे हक्क आणि अधिकार यासंबंधी बालवयातच माहिती व्हावी या उद्देशाने जवळा देशमुख येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेत नारी समता दिनानिमित्त कार्यक्रम घेण्यात आला.

लैंगिक समानतेचा प्रश्न हा संपूर्ण जगाचाच प्रश्न आहे. देशात लैंगिक समानता आणण्याच्या प्रयत्न सुरू आहेत. अनेक देश या विषमतेशी झगडत आहेत. याबाबत लोकांची मानसिकता बदलण्याची गरज आहे. महिलांच्या समानतेचा मुद्दा आता आंतरराष्ट्रीय बनला आहे. हा दिवस भारतातही साजरा केला जातो. आता आंतरराष्ट्रीय स्तरावर महिला समानता दिन साजरा केला जात आहे.

या पार्श्वभूमीवर जवळा देशमुख येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेत मुलींसाठी प्रबोधन कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यात मुख्याध्यापक गंगाधर ढवळे, सहशिक्षक संतोष अंबुलगेकर, संतोष घटकार यांनी मार्गदर्शन केले. यावेळी शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष किशनराव गच्चे, आनंद गोडबोले, मारोती चक्रधर, हैदर शेख मनिषा गच्चे, इंदिरा पांचाळ आदींची उपस्थिती होती.

# देवगिरी येथून साईबाबा पायी पालखी मार्गस्थ

आधुनिक केसरी न्यूज

**दौलताबाद :** येथील ओम साई मित्र मंडळ देवगिरी यांच्या वतीने गेल्या ११ वर्षांपासून परम्परा चालू आहे आज दि. २७ रोजी दौलताबाद येथुन पायी दिंडीचे शिर्डी कडे साई नामाच्या गजरात प्रस्थान झाले या दिंडीत देवगिरी दौलताबाद येथील कुंभारवाडा,गवळीवाडा, अब्दिमंडी, माळीवाडा युवक, महिला मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.





# नवोदय परीक्षेतील यशाबद्दल दिव्या मुळेचा सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**जालना :** परतूर तालुक्यातील आष्टी येथील प्रियदर्शनी इंग्लिश स्कूलची विद्यार्थिनी दिव्या गजानन मूळे हिने नवोदय परीक्षेत विशेष प्राविण्यासह गुण संपादन करून घवघवीत यश मिळवून नवोदय विद्यालयाच्या पुढील शिक्षणासाठी पात्र ठरला आहे. त्यानिमित्त परतूर येथे मराठ सेवा संघाच्या वतीने दिव्या मुळे हिचा शाल,श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या प्रतिभेचा शोध घेऊ त्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणून उच्च दर्जाचे शिक्षण देणे हा नवोदय परीक्षेचा मुख्य उद्देश आहे. या परीक्षेबाबत आता ग्रामीण भागातही मोठ्या प्रमाणात जागृती झाल्याने जिल्हा भरातून हजारो विद्यार्थी परीक्षेत बसत असतात. दिव्या मुळे हिने या परीक्षेत विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण होऊन यश मिळवले आहे.परतुर तालुक्यातील आंबा येथील नवोदय विद्यालयात इयत्ता सहावी पासून पुढील शिक्षण घेण्यासाठी ती पात्र ठरलीआहे. त्याबद्दल परतूर येथे मराठा सेवा संघाच्या वतीने दिव्या मुळे हिचा सत्कार करून अभिनंदन करण्यात आले. यावेळी रिलॅबल अकॅडमीचे संचालक धनंजय आकात, मराठा सेवा संघाचे जिल्हाध्यक्ष रोहित देशमुख,कृषी अधिकारी रामेश्वर रोडगे,वैद्यकीय अधिकारी डॉ.नवल साहेब,गजानन मुळे, सीमा मुळे, लक्ष्मण बोराडे आदी मान्यवरांच्या उपस्थितीत दिव्या मुळेचा सत्कार करण्यात आला.



# देवठाणा येथे अण्णा भाऊ साठे जयंती


आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** दि. २७ ऑगस्ट२०२३ रोजी मौजे देवठाणा तालुका भोकर येथे विश्वसाहित्यरत्न, सत्यशोधक बहुजननायक डॉ.अण्णा भाऊ साठे यांच्या१०३ व्या जयंतीनिमित्त लोकस्वराज्य आंदोलन महाराष्ट्र गाव शाखेचे उद्घाटन सोहळा आणि जाहीर प्रबोधन सभेच्या अध्यक्ष स्थाना वरुन खंबीर नेतृत्व तथा मार्गदर्शक प्राध्यापक रामचंद्रजी भरांडे सर नांदेड यांनी सखोल असे मार्गदर्शन केलेआहे.या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे कृषी सभापती जगदीश पाटील भोसीकर,भगवान दंडवे तालुका अध्यक्ष काँग्रेस कमिटी भोकर, कृषी संचालक रामचंद्र मुसळे सह अनेक काँग्रेसचे कार्यकर्ते, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते तथा पत्रकार अनिल कराळे सोमठाणेकर, अर्जुन गायकवाड मालेगांवकर मराठवाडा कोषाध्यक्ष, माणिक कांबळे,लोकस्वराज्यआंदोलन जिल्हाध्यक्ष उत्तर विभाग नांदेड,बाळासाहेब टिकेकर डौरकर जिल्हाध्यक्ष नांदेड जिल्हा कोअर कमिटी नांदेड,कैलास सुर्यवंशी जिल्हा महासचिव, धोंडोपंत बनसोडे तालुकाध्यक्ष हिमायतनगर, साईनाथ जळपतराव तालुकाध्यक्ष भोकर,नागेंद्र गायकवाड तालुका सचिव भोकर, साहेबराव गव्हाणकर तालुका उपाध्यक्ष उमरी, केशव गायकवाड आंबेगावकर सह शाखेचे अनेक पदाधिकारी, अनेक कार्यकर्ते समाज बांधव महिला, पुरुष आवर्जून उपस्थित होते. या कार्यक्रमांचेआयोजन संजय चिंचोलकर देवठाणा आणि जयंती मंडळाच्या वतीने,गाव शाखेच्या संयुक्त विद्यमानाने करण्यात आले होते.या कार्यक्रमास बहुसंख्येने महिला, पुरुष, युवक,कार्यकर्ते,समाज बांधव मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

# केअर सिग्मा हॉस्पिटलमध्ये यकृताचे आजार असलेल्या रुग्णांची तपासणी व उपचार

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** केअर सिग्मा हॉस्पिटल्स्, औरंगाबाद



येथे बुधवार, दि. ६ सप्टेंबर २०२३ रोजी सकाळी १० ते ३ वाजेपर्यंत हैद्राबाद येथील यकृत प्रत्यारोपण तज्ञ डॉ.वचन हुकेरी हे डॉ. उन्मेष टाकळकर (पोटविकार, कर्करोग व यकृतरोगतज्ञ) यांच्या सोबत रुग्ण तपासणीसाठी उपलब्ध राहणार आहेत. यकृत प्रत्यारोपण (लहान मुले व प्रौढ), यकृताचा सोरायसिस- कर्करोग - ट्युमर, यकृत फेल्युअर, हिपॅटायटिस 'बी' आणि 'ए', व्यसनामुळे झालेले यकृताचा आजार, यकृताचा कावीळ व फॅटी यकृत, पोटातील रक्तस्त्राव इत्यादी संबंधीत आजार असलेल्या रुग्णांनी सवलतीत उपचारासाठी तपासणी करुन घ्यावी.

शिबीराच्या निमीत्ताने यकृताच्या आजारासंबंधीत असलेल्या ६ महत्वाच्या चाचण्यां विशेष सवलतीसह करण्यात येतील. तसेच या शिबीरात पोलीस प्लॉन, पी.एम.जे.वाय. एम. जे. पी. जे. ए. वाय व इतर सर्व सरकारी योजनांमध्ये योजनेसाठी पात्र असलेल्या रुग्णांकरिता युनायटेड सिग्मा इन्स्टिट्युट ऑफ मेडिकल सायन्स प्रा. लि., शहानूरवाडी, औरंगाबाद येथे प्रत्यक्ष किंवा हेल्पलाईन क्रं. ९६२३४६४२११, (०२४०) ६६७६६६६ क्रमांकावर नोंदणी करावी, अशी माहिती केअर सिग्मा हॉस्पिटल्स वतीने देण्यात आली आहे.

हिवराळे क्लिनिक
ॲण्ड हर्बल हेल्थ केअर
9130174444
डॉ. के.बी. हिवराळे
आयुर्वेद जनरल फिजिशियन,
ॲक्युपंक्चर तज्ज्ञ
B.A.M.S., N.D.,C.M.S.& Ed(MUMBAI)
R.No.2366/12/2000
एमसीए/2022/10/बी/000839 बॉम्बे नर्सिंग होम परवाना क्र.218, औरंगाबाद
उपलब्ध सुविधा
- जुनाट सांधे दुखी (गुडघे दुखी)
- आम वात उदर रोग
- दमा व ॲलर्जी (जुनाट)
- चिकन गुनिया
- मनोकयीईक आजार
- त्वचा व गुप्त रोग
- स्त्रीयांचे आजार
- स्थूलपणा, मूळव्याध
- वंध्यत्व, संतती प्राप्ती
- कॅन्सर सल्ला, मुतखडा
- वजन वाढविणे
- वजन कमी करणे
- केसांच्या सर्व तक्रारी
- लहान मुलांची
- स्मरणशक्ती वाढविणे
पंचकर्म सुविधा (मुख्यकार्य) 1) वमन, 2) विरेचन, 3) बस्ती, 4) नस्य, 5) रक्तमोक्षन

अजिंठा रोड, सारा कॉलनी, फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद

# ब्रिलियंट स्कूलने भिंतीत कोरली संविधान उद्देशिका

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** आम्ही भारताचे लोकही भारतीयत्वाची भावनाप्रत्येक भारतीयास जागृत करण्याचे काम आपलं संविधान करत असते. संविधानाच्या उद्देशिकेची सुरुवातच आम्ही भारताचे लोक या वाक्याने होते. हीच उद्देशिका विद्यार्थ्यांना अधिक ठळकपणे समजावी म्हणुन शालेय स्तरावर विशेष प्रयत्न केल्यास संविधानाची मूल्ये विद्यार्थ्यां मध्ये आपोआप रुजण्यास सुरुवात होईल. संविधाना बाबतची साक्षरता येण्यास वेळ लागणार नाही. शाळेतून शिकणारा विद्यार्थी हा संविधान साक्षर होऊनच बाहेर पडू शकतो. म्हणून शालेय स्तरावर विद्यार्थ्यांना संविधान जागृतीचे उपक्रम हाती घेणे आवश्यक आहे.आम्ही भारताचे लोक ते सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही, गणराज्य आदी महत्वपूर्ण मूल्यांचा समावेश असलेली संविधान उद्देशिका विद्यार्थ्यांना ठळकपणे समजावित म्हणून संविधान उद्देशिका भिंतीवर रेखाटण्याचे काम खंडाळा बावडा येथील ब्रिलियंट इंग्लिश मिडीयम स्कूल ॲन्ड ज्युनिअर कॉलेज या शाळेने केलेले आहे.संस्थेचे उपाध्यक्ष जयकुमार यांच्या संकल्पनेतून साकार झालेली ही संविधान उद्देशिका संविधान जनजागृतीच्या दृष्टीने महत्वाची असून याबद्दल शाळेचे विशेष कौतुक केले जात आहे. ह्या शाळेचा आदर्श घेऊन सर्वच शाळांमध्ये अशा प्रकारची संविधान उद्देशिका भिंतीवर कोरण्याची आवश्यकता आहे. ही शाळा विविध उपक्रमाद्वारे विद्यार्थ्यांसाठी संविधाना संबंधित ज्ञान देण्याचा प्रयत्न करत आहे.त्यांना संविधान समजावे म्हणून येत्या २६ नोव्हेंबर रोजी संविधान दिनाच्या निमित्ताने राज्य स्तरीय संविधान परीक्षेत सुद्धा या शाळेने सहभागी होण्याचा निर्णय घेतलेला आहे. संस्थेचे उपाध्यक्ष जयकुमार खरात हे स्वतः संविधान जाणून आहेत. नेहमी संविधानाचे कार्य करत असतात. आपल्या शाळेतील विद्यार्थ्यांना सुद्धा संविधानाची अधिक माहिती व्हावी म्हणून कृतीतून संविधानाची ठळक मूल्ये शाळेच्या मुख्य प्रवेश द्वारा जवळ कोरल्याने शाळेत ये जा करणाऱ्यासाठी ही संविधान उद्देशिका डोळ्या समोरच दिसत असते. ही संविधान उद्देशिका संविधान निष्ठा निर्माण करणारी आहे. संस्थेचे उपाध्यक्ष जयकुमार खरात यांच्या सह सचिव स्नेहल खरात,प्राचार्या सुदर्शना जाधव, उपप्राचार्या स्वाती ढमाळ, उपशिक्षिका संध्या मोरे, रुपाली ढमाळ,रेश्मा भोसले,नाजनिन शेख, स्वाती कोंडे, मिनल गाढवे, पूजा पडगीलवार,माधवी बडदे, उषा पवार,वैष्णवी पवार, सागर घाडगे,स्वाती जाधव, वर्षा भोसले,



कोमल सावंत, श्रद्धा गायकवाड, शीतल कुंभार, काजल गायकवाड, वनिता गजफोडे,अक्षय पवार, हिरा जावळे, शीतल सांगळे, मिनल किंद्रे, संतोष किंद्रे आदी शिक्षक वृंद तसेच विद्यार्थी व पालकवर्ग आदीं संविधान उद्देशिके बद्दल विशेष समाधान व्यक्त करत आहेत.



# अन्न वाचवा समितीचे जागृती अभियान


आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** इंडियन फुड टेकनॉलाजी हया पैठण रोड वर असलेल्या कॉलेज मध्ये अन्न नासाडी जागृती अभियान घेण्यात आले. कार्यक्रमास 300 पेक्षा जास्त मुली उपस्थित होत्या सर्वांनी अभियान शांत पणे ऐकून घेऊन खूप चांगला प्रतिसाद दिला. अभियानात कॉलेज च्या प्राचार्य मॅडम तसेच सर्व शिक्षक आणि कर्मचारी वर्ग उपस्थित होता तसेच अन्न वाचवा समितीचे अनंत मोटाळे चंद्रकांत वाजपेयी, दिलीप आसबे, नागेश गवले, राजेंद्र वाहुले, नंदकुमार कुलकर्णी, रुपाली वाहुले यांची उपस्थिती होती. सर्वांनी शेवटी स्वच्छ ताट जेवणाचा संकल्प घेतला काही क्षण चित्र

# अण्णा भाऊ साठे जयंती उत्साहात साजरी

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** विदर्भ ते तेलंगणा राज्य सीमेजवळील अतिशय दुर्गम,



माणिकगड पहाडा वरील परिसरातील घनदाट जंगलात वसलेले तसेच कोणतेही मोबाईल नेटवर्क नसलेले मौजे गुडशेला तालुका जिवती जिल्हा चंद्रपूर येथे सार्वजनिक जयंती मंडळाच्या व लोकस्वराज्य आंदोलन तालुका शाखा जिवती जिल्हा चंद्रपूर यांच्या संयुक्त विद्यमाने विश्वसाहित्यरत्न, सत्यशोधक, बहुजन नायक डॉ.अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त जाहीर प्रबोधन सभा दुपारी आयोजित करण्यात आली होती. यामध्ये प्रमुख मार्गदर्शक म्हणून लोकस्वराज्य आंदोलनाचे खंबीर नेतृत्व तथा मार्गदर्शक प्राध्यापक रामचंद्रजी भरांडे सर यावेळी बोलताना, तर ॲड. दत्तराज गायकवाड प्रदेशाध्यक्ष, युवक आघाडी, महाराष्ट्र राज्य, अर्जुन गायकवाड मालेगांवकर, मराठवाडा कोषाध्यक्ष, माणिक कांबळे जिल्हाध्यक्ष उत्तर विभाग नांदेड, विदर्भाची बुलंद आवाज शाहीर श्याम ढगे जिवतीकर, लहुकांत काकडे, धोंडोपंत बनसोडे तालुकाध्यक्ष हिमायतनगर, केशव गायकवाड आंबेगावकर सह अनेक कार्यकर्ते, समाज बांधव यावेळी आवर्जून उपस्थित होते.



# वडोद बाजार येथे कामगारांना पेट्या वाटप

आधुनिक केसरी न्यूज

**वडोद बाजार :** फुलंब्री तालुक्यातील येथे इमारत बांधकाम कामगारांना मान्यवरांच्या हस्ते दीडशे पेट्यांचे वाटप करण्यात आले. उपसरपंच गोपाल वाघ, साबेर पठाण चेअरमन कडुबा मस्के, संघटनेचे तालुका उपाध्यक्ष ताजमात शहा ग्रामपंचायत सदस्य शुभम गंगावणे, अरुण वायकोस, अजिनाथ वाघ, अनिल वाघ, अशोक शिंगारे, अशपाक बेग, बंडू कोलते, नवनाथ मिर्झा बेग, शेख रईस, शेख अंजुम, शेख पप्पू, माणिक डेरे, पांडुरंग ब्राह्मणे आधी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पत्त्याच्या क्लबला कोणाचा आशीर्वाद?

आधुनिक केसरी न्यूज



**धर्माबाद :** तालुका सीमावर्ती भागात असल्यामुळे येथे पत्त्यांचे क्लब, सट्टा असो की अवैध दारू, शिंदी विक्री जोरात सुरु असते यामुळे खाकीवर्दीतील अधिकाऱ्यांना 'गांधी' प्रसन्न होण्याचे प्रमाण ही लक्षणीय असते त्यामुळे या तालुक्यातील गाव खेड्यात ही अवैधधंद्याचे लोण पोहचले आहे. चिंचोली येथे पत्त्यांचे क्लब जोरात सुरु असल्याची माहिती आहे. तालुक्यात नवीन अधिकारी आले की, पाहिलं टार्गेट हे अवैध दारू, शिंदी विक्रेते आणि क्लब चालक असतात.यामुळे त्यांची दोन नंबर धंद्यातील लोकांवर वचक निर्माण होते. मात्र काही काळानंतर हे अवैध व्यवसाय जोरात सुरु राहतात. अचानक असे काय बदल होतो की, ज्या अवैध व्यवसायाचा कर्दनकाळ, दबंग अधिकारी म्हणून लोक ज्यांच्याकडे बघतात.त्यांच्याच काळात ह्या धंद्यातील लोकांत गांधी मूल्य दिसू लागतात. तालुक्यातील चिंचोली येथे पत्त्याचे क्लब जोरात असून येथे लाखोची उलाढाल सुरु आहे. यामुळे नवतरुण मुले आपल्या कुटुंबाकडे दुर्लक्ष करून, कर्ज करून पत्ते खेळायला क्लब मध्ये जातात. यामुळे अनेकांच्या संसाराची राखरांगोळी होत आहे. लोकांचे संसार उध्वस्त होण्यापूर्वी पोलीस प्रशासनानी यावर कडक कारवाई करावी अशी मागणी संबंधित गावातील लोकांकडून केली जात आहे. यावर काय कारवाई होते याकडे सर्वांचे लक्ष लागलेले आहे.

गुप्तरोगाबाबत
काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट
महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com sumitparakh73@gmail.com
S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर